सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१८५ प्र.ठ. क्र.१६५
दि.१२/१०/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील जुना प्र.क्र. ०२ मधील रुपा भवानी स्मशानभूमी येथे विविध सुधारणा करणे या कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करण्यात आलेले पूर्वगणनपत्रक क्र. ४९ सन २०१७-१८ र.रु. ५९,२३,४८२/- यांस र.रु. ४८.०० लाख इतकेचे जि.वा.यो सन २०१७-१८- नाविन्यपूर्ण योजनाच्या बजेट मधून मंजूरी मिळालेली आहे व तसेच नगर अभियंता यांनी प्रस्तावित केल्यानुसार ई-निविदा व जाहिर प्रसिध्दीकरणास अनुसरुन प्राप्त सर्वात कमी दराचे मक्तेदार चौधरी एम.आर. यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या मक्ता रकमेपेक्षा ११.५५% कमी दराने काम करुन घेणेस, येणा-या खर्चास, योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी प्रस्ताव महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) ने व मा. स्थायी समिति कार्यरत नसलेने सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे एमएमसी ॲक्ट कलम ३५ (अ) अन्वये मंजूरीसाठी सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

रुपा भवानी स्मशानभूमी येथे उपलब्ध सोयी सुविधांचा विचार करता आवश्यक त्या कामांचा प्राधान्याने करुन घेणेची कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१.६८.ठ. क्र....१६१
दि..१२.१०.१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१८८

प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ नुसार कामकाज करण्याकामी मा. आयुक्त यांचेकडील जा.क्र.नआ/वै/१५९, दि. १६-८-२०१८ चे कार्यालयीन आदेशात नमूद अपर आयुक्त, उपायुक्त व सहा. आयुक्त यांचेकडे विभागाचे कामकाज सोपविण्यात आले आहे. श्री. अभिजीत हराळे, सहाय्यक आयुक्त (जनरल) यांची अन्यत्र बदली झाल्याने अपर आयुक्त व उपायुक्त यांचेकडे सोपविण्यात येत आहे. तसेच कार्यालयीन आदेशात नमूद अधिका-यांनी त्यांच्या नावाखाली दर्शविलेल्या विभागाचे नियंत्रक अधिकारी म्हणून आदेशाच्या दिनांकापासून कामकाज पाहावयाचे आहे. सदरची बाब मा. मनपा सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक १६-८-२०१८ चे कार्यालयीन आदेशाची माहिती घेणेबाबत आलेल्या आदेशाचे अवलोकन केले.

या प्रकरणी मा. उपायुक्त यांचे अधिकारामध्ये नमूद केलेल्या विभागामधील शहर हद्दवाढ विभाग हा वगळून शहर हद्दवाढ विभाग हा श्री. माने एस. एस. सहाय्यक आयुक्त (पूर्वीचे विशेष कार्यकारी अधिकारी पद) यांना देण्यास व याप्रमाणे बदलासह मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१८९ ठ. क्र....१५०
दि.१२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१८९

सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडील औज बंधारा येथे पाण्याची पातळी संपल्याने सोलापूर शहर पाणी पुरवठा अखंडपणे चालू राहणेकरिता खाजगी पोकलेन मशीनने तातडीने नदी पात्रात खोलवर खोदाई करुन चर मारणेसाठी खाजगी मक्तेदाराकडून दि. २५-४-२०१७ ने पाणी औज व चिंचपूर बंधा-यात पोहोचेपर्यंत पोकलेन मशीन लावून काम करुन घेणेस, झालेला प्रत्यक्ष खर्च र.रु. १,२५,४९१/- यास सदरचा खर्च सन २०१७-१८ भांडवली कामे पाण्याच्या टाक्या बांधणे/पाईप लाईन घालणे या बजेट सदरी टाकणेस, सदरचे काम अत्यंत तातडीने करणेचे असलेने जाहिरप्रसिध्दीकरण व करारपत्र करण्याची अट शिथील करणेस सदर प्रकरणास मनपा सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २८-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १५०८ ठ. क्र. १६९
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १५ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाचे रंगकामाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयास अनुसरुन पुतळा रंगकाम करणेचे कोटेशन शिल्पकार नितीन जाधव यांनी रक्कम रु. २,८०,०००/- इतकेचे कोटेशन दिलेले होते. सदरचे काम दिलेल्या कोटेशन प्रमाणे करुन घेणेस मा. आयुक्त यांनी दि. २८-३-१८ रोजी मान्यता घेऊन जागेवर काम पूर्ण करणेत आलेला आहे. सदर कामापोटी मक्तेदार यांना ५०% ॲडव्हॉन्स म्हणजेच र.रु. १.४० लाख इतकी रक्कम मा. मुख्यलेखापाल कार्यालयामार्फत अदा करणेत आलेला आहे. त्याअनुषंगाने प्रकरण मा. स्थायी समितीपुढे जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील होणेकामी सादर केले असता प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्रान्वये आजला मा. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक प्रक्रिया ही न्यायप्रविष्ठ असल्याने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे मा. आयुक्त यांनी खाते प्रमुखांच्या साप्ताहिक बैठकीच्या वेळी अशी सर्व प्रकरणे संबंधित विभागाकडे परत पाठविणेबाबत समक्षतेत आदेश दिलेले आहेत. असे पत्र प्रस्तावात नमूद कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्राचे अनुषंगाने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नसल्यामुळे सदरचे संपूर्ण प्रकरण मा. सर्वसाधारण सभेकडे प्रस्तावित प्रमाणे कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करणेस मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज...१६१ ठ. क्र.....१५०२
दि..१२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहाच्या (डफरीन हॉस्पीटल) येथील पंप हाऊस मधील पंप स्वच्छ करणे, वॉटर फ्रुफींग करणे, कठडा दुरुस्ती करणे, दरवाजा बदलणे, खिडक्यांच्या काचा बदलणे, रंगरंगोटी करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयास अनुसरुन पूर्वगणनपत्रक क्र. ७/२/३०, र.रु. १,९९,६६७/- (मक्त्याची रक्कम रु. १,८१,२६८/-) इतकेचे काम नोंदणीकृत वार्षिक मक्तेदार सुनिल दुधगुंडी यांचेकडून एस्टीमेट दराने काम करुन घेणेस मा. आयुक्त यांची दि. २७-३-२०१८ रोजी मान्यता घेऊन जागेवर काम पूर्ण करणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने सदरचे प्रकरण मा. स्थायी समितीकडे कार्योत्तर मान्यता मिळणेस प्रकरण सादर केले असता प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्रान्वये आजला मा. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक प्रक्रिया ही न्यायप्रविष्ठ असल्याने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे मा. आयुक्त यांनी खाते प्रमुखांच्या साप्ताहिक बैठकीच्या वेळी अशी सर्व प्रकरणे संबंधित विभागाकडे परत पाठविणेबाबत समक्षतेत आदेश दिलेले आहेत. असे पत्र प्रस्तावात नमूद कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्राचे अनुषंगाने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नसल्यामुळे सदरचे संपूर्ण प्रकरण मा. सर्वसाधारण सभेकडे प्रस्तावित प्रमाणे कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करणेस मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

[signature] P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ११५२ ठ. क्र. १५३
दि. २१.१०.१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहाच्या ऑपरेशन थेअटरची दुरुस्ती करणे, अॅल्युमिनीअम दरवाजा बसविणे व सदर इमारतीच्या भोवती असलेली रफ शाबाद फरशी बदलणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयास अनुसरुन पूर्वगणनपत्रक क्र. ७/२/१८ र.रु. ४,९८,३८४/- ( मक्त्याची रक्कम रु. ३,८१,३६२/-) इतकेचे काम नोंदणीकृत वार्षिक मक्तेदार सुनिल दुधगुंडी यांचेकडून एस्टीमेट दराने काम करुन घेणेस मा. आयुक्त यांची दि. २७-३-२०१८ रोजी मान्यता घेऊन जागेवर काम पूर्ण करणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने सदरचे प्रकरण मा. स्थायी समितीकडे कार्योत्तर मान्यता मिळणेस प्रकरण सादर केले असता प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्रान्वये आजला मा. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक प्रक्रिया ही न्यायप्रविष्ठ असल्याने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे मा. आयुक्त यांनी खाते प्रमुखांच्या साप्ताहिक बैठकीच्या वेळी अशी सर्व प्रकरणे संबंधित विभागाकडे परत पाठविणेबाबत समक्षतेत आदेश दिलेले आहेत. असे पत्र प्रस्तावात नमूद कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्राचे अनुषंगाने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नसल्यामुळे सदरचे संपूर्ण प्रकरण मा. सर्वसाधारण सभेकडे प्रस्तावित प्रमाणे कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करणेस मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१५३ ठ. क्र....१५४
दि.१२/१०/१८..रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहाच्या आतील व बाहेरील कलर करणे व वॉटर फ्रुफींग करणे
बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयास अनुसरुन पूर्वगणनपत्रक क्र. ७/२/३२ र.रु.
४,९८,८७८/- ( मक्त्याची रक्कम रु. ४,५२,९०८/-) इतकेचे काम नोंदणीकृत वार्षिक मक्तेदार
महाराणा प्रतापसिंह कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा.प्रताप विठ्ठलसिंह मनसावाले) यांचेकडून एस्टीमेट दराने मा.
आयुक्त यांना प्रदान केलेल्या कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन जागेवर
काम पूर्ण करणेत आलेला आहे. त्याअनुषंगाने सदरचे प्रकरण मा. स्थायी समितीकडे माहितीस्तव
सादर केले असता प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्रान्वये आजला मा. सभापती स्थायी समिती पदाची
निवडणूक प्रक्रिया ही न्यायप्रविष्ठ असल्याने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या
नाहीत. त्यामुळे मा. आयुक्त यांनी खाते प्रमुखांच्या साप्ताहिक बैठकीच्या वेळी अशी सर्व प्रकरणे
संबंधित विभागाकडे परत पाठविणेबाबत समक्षतेत आदेश दिलेले आहेत. असे पत्र प्रस्तावात नमूद
कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. तरी मंजूर मक्तेदार महाराणा प्रतापसिंह कन्स्ट्रक्शन (प्रो.प्रा.प्रताप
विठ्ठलसिंह मनसावाले) यांनी केलेल्या विषयातील कामाचे संदर्भीय पत्राचे अनुषंगाने मा. स्थायी
समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नसल्यामुळे सदरचे संपूर्ण प्रकरण मा. सर्वसाधारण
सभेकडे माहितीस्तव सादर करणेस मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता
देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१९४ ठ. क्र....१९५
दि.१२.१०.१९...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृह (डफरीन हॉस्पीटल) येथील जुने कुटूंब कल्याण कार्यालय (आरोग्य अधिकारी निवासाचे) कौलारु बदलणे, ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे, संडास बाथरुम टाईल्स बदलणे, पाठीमागील भिंत बांधणे, गिलावा करणे, फरशी दुरुस्ती करणे, एका रुममध्ये मॅटींग करणे, रंगरंगोटी करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयास अनुसरुन पूर्वगणनपत्रक क्र. ७/२/३३ र.रु. ७,१६,७२७/- ( मक्त्याची रक्कम रु. ७,२६,६१०/-) इतकेचे काम नोंदणीकृत वार्षिक मक्तेदार श्री. स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन (श्रीनिवास नरसय्या इप्पाकायल) यांचेकडून एस्टीमेट दराने मा. आयुक्त यांना प्रदान केलेल्या कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन जागेवर काम पूर्ण करणेत आलेला आहे. त्याअनुषंगाने सदरचे प्रकरण मा. स्थायी समितीकडे माहितीस्तव सादर केले असता प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्रान्वये आजला मा. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक प्रक्रिया ही न्यायप्रविष्ठ असल्याने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे मा. आयुक्त यांनी खाते प्रमुखांच्या साप्ताहिक बैठकीच्या वेळी अशी सर्व प्रकरणे संबंधित विभागाकडे परत पाठविणेबाबत समक्षतेत आदेश दिलेले आहेत. असे पत्र प्रस्तावात नमूद कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्राचे अनुषंगाने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नसल्यामुळे सदरचे संपूर्ण प्रकरण मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव सादर करणेस मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज ९६.प्र.ठ. क्र......९६५
दि. १२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहाचे अंतर्गत ड्रेनेज लाईन बदलणे, नविन चेंबर बांधणे, इमारतीचे सर्व डाऊनटेक पाईप बदलणे, छतावरील सिंटेक्स टाकी बसवून अंतर्गत पाईप लाईन दुरुस्ती करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव विषयास अनुसरुन पूर्वगणनपत्रक क्र. ७/२/३१ र.रु. ४,९९,३९७/- ( मक्त्याची रक्कम रु. ४,५३,३७९/-) इतकेचे काम नोंदणीकृत वार्षिक मक्तेदार सुनिल दुधगुंडी यांचेकडून एस्टीमेट दराने काम करुन घेणेस मा. आयुक्त यांची दि. २९-३-२०१८ रोजी मान्यता घेऊन जागेवर काम पूर्ण करणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने सदरचे प्रकरण मा. स्थायी समितीकडे कार्योत्तर मान्यता मिळणेस प्रकरण सादर केले असता प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्रान्वये आजला मा. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक प्रक्रिया ही न्यायप्रविष्ठ असल्याने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे मा. आयुक्त यांनी खाते प्रमुखांच्या साप्ताहिक बैठकीच्या वेळी अशी सर्व प्रकरणे संबंधित विभागाकडे परत पाठविणेबाबत समक्षतेत आदेश दिलेले आहेत. असे पत्र प्रस्तावात नमूद कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्राचे अनुषंगाने मा. स्थायी समितीच्या साप्ताहिक बैठका होऊ शकल्या नसल्यामुळे सदरचे संपूर्ण प्रकरण मा. सर्वसाधारण सभेकडे प्रस्तावित प्रमाणे कार्योत्तर मान्यतेस्तव सादर करणेस मा. आयुक्त यांचे दिनांक ३१-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १६६ दि.१२.१२.२०१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव क्र.......१७७
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

११६

दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाच्या SUH नागरी बेघरांना निवारा घटकाअंतर्गत भवानी राम शिखची धर्मशाळेत तात्पुरता निवारा केंद्र सुरु करण्यात आले होते.सदर बेघर केंद्रामधील बेघरांना व मनोरुग्ण यांना तातडीने अन्न पुरवठा करणे आवश्यक असल्याने महिला व बालकल्याण विभागाकडील प्रसूती महिलांना अन्न पुरवठा कराणारे मंजूर मक्तेदार साईबाबा महिला बचत गट व जाई-जुई महिला बचत गट यांच्या मार्फत माहे फेब्रूवारी २०१८ व मार्च २०१८ मध्ये प्रति लाभार्थी १५०/- प्रमाणे नाष्टा व दोन वेळा जेवण देण्यांत आले होते.सदर जेवणाचे एकूण र.रु.१,८०,१५०/- इतके खर्च आलेला आहे.प्रस्तावात नमूद कारणास्तव सदर दोन बचत गटाकडून विषयांकित काम करुन घेणे तातडीचे असल्याने याकामी जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथिल करणेस्तव सध्या मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्यामुळे प्रस्तुत कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५(अ) अन्वये मा.सर्व साधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक ३१/०८/२०१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज १९ (ठ. क्र.....१५८
दि. १५.१०.१८....रोजो ठेवता खालील प्रो. ठराव..
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

११७

सार्वजनिक आरोग्य अभियंता कडील वाहन क्र.P-०३६१ दुरुस्तीबाबत र.रुपये ८६५१/- इतक्या खर्चापोटी जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथिल होवून झालेल्या खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी प्रकरण मा.स्थायी समितीकडे फेर सादर केले असता, मा. स्था.स.ठ.क्र.२९६,दि.२८/०२/२०१८ अन्वये ठरावात नमूद आक्षेपांची पूर्तता करुन फेर सादर करणेस मान्यता देण्यांत आलेली आहे.त्यानुसार प्रस्तावात नमूद सविस्तर माहिती सादर असून,सदर वाहन क्रमांक p०३६१ या वाहनाचे दुरुस्तीकामी आलेले र.रुपये ८६५१/-इतक्या खर्चापोटी जाहीर पसिध्दीकरणाच अट शिथिल होऊन मिळणेबाबत सध्या मा.स्थायी समितीच्या बैठका होत नसल्याने याकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३५(अे) प्रमणे सदरचे प्रकरण कार्योत्तर मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेकडे फेर सदर करणेकामी मा.अतिरिक्त आयुक्त यांचे दि.२३/८/२०१८चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सुसार संपूर्ण ...

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जा १२/०७/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव क्र. ... २०५
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सार्वजनिक आरोग्य अभियंता कडील वाहन क्रमांक p-०१६७ दुरुस्तीबाबत र.रुपये ३५३६१/-इतक्या खर्चापोटी जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथिल होवून झालेल्या खर्चास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी प्रकरण मा.स्थायी समितीकडे फेर सादर केले असता, मा. स्था.स.ठ.क्र.२९७,दि.२८/०२/२०१८ अन्वये ठरावात नमूद आक्षेपांची पूर्तता करुन फेर सादर करणेस मान्यता देण्यांत आलेली आहे.त्यानुसार प्रस्तावात नमूद सविस्तर माहिति सादर असून,सदर वाहन क्रमांक p-०१६७ या वाहनाचे दुरुस्तीकामी आलेले र.रुपये ३५३६१/-इतक्या खर्चापोटी जाहीर पसिध्दीकरणाच अट शिथिल होऊन मिळणेबाबत सध्या मा.स्थायी समितीच्या बैठका होत नसल्याने याकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३५(अे) प्रमणें सदरचे प्रकरण कार्योत्तर मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेकडे फेर सदर करणेकामी मा.अतिरिक्त आयुक्त यांचे दि.२३/८/२०१८चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

११८

नगर सचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १६६ ठ. क्र. १८०
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. एस. एन. माने, कार्यालय अधिक्षक यांची शासन मान्यतेच्या अटीस अधिन राहून विशेष कार्यकारी अधिकारी यापदी नियुक्ती करणेत आलेली होती. श्री. एस. एन. माने यांना सहा. आयुक्त (पूर्वीचे विशेष कार्यकारी अधिकारी ) या पदी नियुक्त करणेस शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. यास्तव श्री. एस. एन. माने, सहा. आयुक्त (पूर्वीचे विशेष कार्यकारी अधिकारी ) या पदावरील नियुक्ती नियमीत करण्यात येत असून त्यांच्याकडे प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने मा. आयुक्त यांचेकडील जा.क्र.नआ/वै/१८५, दिनांक २१-९-२०१८ चे आदेशात नमूद केलेप्रमाणे विभागाचे कामकाज सोपविण्यांत येत आहे. सदरची बाब मा.म.न.पा. सभेकडे माहितीस्तव ठेवणेबाबत मा. आयुक्त यांचे दिनांक २१-९-१८ चे आदेशाचे अवलोकन केले.

शहर हद्दवाढ विभाग हा श्री. एस. एस. माने यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. या बदलासह उपरोक्त आदेशाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०-०.ठ. क्र......१८१
दि.१२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२००

प्रभाग क्र. १४ मध्ये बेगमपेठ परिसरातील पेंटरचौक ते प्लसपॉइंट या रस्त्यास माजी नगरसेवक **मरहूम अल्लाबक्ष दिना मार्ग** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०१.ठ. क्र....१८२
दि.१२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२०१

श्री. केशव द. गुंटूक रा. २१२, जानकी नगर, जुळे सोलापूर मारुती मंदिर बाजूला सोलापूर यांचा मुलगा साईश्वर गुंटूक वय वर्षे ९ हा इयत्ता तिसरी मध्ये ज्ञानज्योती मराठी विद्यालयाचा विद्यार्थी असून तो उत्कृष्ठ मॅराथॉन खेळाडू असून त्यांनी कोल्हापूर, मध्यप्रदेश, पुणे, मुंबई, पंजाब, लोणावळा, खराडी, हैद्राबाद, बेंगलोर, इंदौर अशा ठिकाणी मॅराथॉन स्पर्धेत भाग घेऊन यश संपादन केले आहे. पंजाब येथे त्याला **ज्युनिअर मिल्खासिंगचा** किताब तसेच खराडी येथे **बेस्ट कीड ऑफ द इयर** चा सन्मान मिळाला आहे. श्री. साईश्वर गुंटूक याची जम्मू येथील कारगील इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. सदर ठिकाणी जाणे-येणेसाठी १४ हजार रु. प्रवासखर्च येणार आहे व सदरचा प्रवासखर्च करण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नाही. श्री. केशव द. गुंटूक यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांचा मॅरॉथॉन खेळाडू मुलास प्रवासखर्चापोटी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०२७. क्र......१८३
दि.१५.१०.१९८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहराच्या मानाच्या आराध्य देवी श्री. रुपाभवानी देवी मातेचे आख्यायिका मोठया प्रमाणात आहे. भाविकांची संख्या सोलापूरच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्र व परराज्यात मोठया प्रमाणात असते. भक्तांची नेहमी दर्शनासाठी ये-जा असते. याठिकाणी माता रुपाभवानीवर मोठी श्रध्दा आहे. भक्तांच्या मागणीनुसार सिध्देश्वर वुमन्स कॉलेजच्या पुढील व भवानी पेठ वर्क्स अलिकडील आयलॅन्ड असलेल्या चौकास **श्री. माता रुपाभवानी चौक** असे नामकरण करणेस, येणारे खर्चास व नामफलक लावणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सिध्देश्वर वुमन्स कॉलेजच्या पुढील व भवानी पेठ वर्क्स अलिकडील आयलॅन्ड असलेल्या चौकास **आई रुपाभवानी चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

Sd/- U.P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २०३ ठ. क्र. ......१८४
दि. १२.१०.१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सोलापूर महानगरपालिकेकडे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मक्तेदार श्री. आर. के. कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. मोतीलाल रामू राठोड यांनी मक्तेदार नोंदणीकरिता आवश्यक ती कागदपत्रे सादर केले असलेने व ती वर्ग अ करिता योग्य असल्यामुळे त्यांचे वर्ग अ मध्ये नोंदणी करणेस व मान्यतेअंती नोंदणी फी र.रु. २०,०००/- इतकी फी स्विकारुन नोंदणी प्रमाणपत्र देणेस मक्तेदार श्री. आर. के. कन्स्ट्रक्शन प्रोप्रा. मोतीलाल रामू राठोड यांचेकडून र.रु. २०,०००/- इतकी नोंदणी फी घेऊन, त्यांना वर्ग अ मध्ये नोंदणी करणेस व नोंदणी प्रमाणपत्र देणेस, मा. उपायुक्त यांचे दिनांक १८-५-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रकरणी संबंधित मक्तेदार यांनी चालू वर्षांचा महानगरपालिकेचा टॅक्स तसेच इतर सर्व टॅक्सेसची वसुली करण्यांत आली आहे काय ? या संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत आहे.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या प्रमुख/मागणी/विषय
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.२०१८ ठ.क्र.....३८७
दि.१२/१२/२०१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



नगरअभियंता विभागाकडील विविध देखभाल दुरुस्ती या कामासाठी वार्षिक मक्ता निश्चित करणेबाबत (मक्ता रक्कम ८५ लाख) मा.आयुक्त यांचे दि.२५/०८/२०१८ रोजी जाहिर प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविले असता,एकूण २६ मक्तेदार प्राप्त झालेले आहेत.निविदा प्रक्रियेतील १ ते २६ मक्तेदारांचे दिलेले दराचे अवलोकन केले असता मक्तेदार राऊत कन्स्ट्रक्शन यांनी मक्त्याचे रक्कमेपेक्षा ०.२०% जास्त दर दिलेले दर सर्वात कमीचे आहेत,त्यामुळे सर्वात कमीचे दर देणारे मक्तेदार राऊत कन्स्ट्रक्शन यांचेशी मा.आयुक्त यांच्या समवेत दि.२६/०५/२०१७ रोजी वाटाघाटी करुन त्यांनी दिलेल्या दराऐवजी DSR सन २०१६-१७ + ५ % मनपा क्षेत्र या दरापेक्षा १ % कमी दराने काम करणेस तयार असले बाबत राऊत कन्स्ट्रक्शन व उर्वरित २५ मक्तेदार यांनी पत्र दिले आहेत.त्या अनुषंगाने मा.स्थायी समितीने दि.०३/०२/२०१८ रोजीचा ठ.क्र.२४१ अन्वये २६ मक्तेदार व त्या व्यतिरिक्त आणखी ५ मक्तेदारांची नांवे समाविष्ठ करुन मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.तद्नंतर निविदेच्या प्रक्रियेत भाग घेतलेले १ ते २६ मक्तेदारांना वर्क ऑर्डर देण्यात आले आहे. तद्नंतर नगरअभियंता विभागाकडील विविध देखभाल दुरुस्ती या कामासाठी वार्षिक मक्ता निश्चित करणेबाबत (मक्ता रक्कम ८५ लाख) बंद लिफाफा पध्दतीने निविदा मूळ दराने म्हणजे DSR सन २०१६-१७ + ५ % मनपा क्षेत्र या दरापेक्षा १ % कमी दराने निविदा मागविले असता एकूण १५ मक्तेदारांनी निविदा भरलेली आहे. बंद लिफाफा पध्दतीने एकूण १५ मक्तेदार यांनी भरलेली पैकी ५ मक्तेदारांची नांवे (श्री.अजयकुमार भोजणा घोडके,सायली एंटरप्रायझेस,श्री.संजय ज्ञानेश्वर यमपुरे,धर्मराज कन्स्ट्रक्शन,अभिषेख कन्स्ट्रक्शन) मा.स्थायी समितीने दि.०३/०२/२०१८ ने ठ.क्र.२४१ अन्वये मंजूरी दिली आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चॅप्टर ५ (२)(२) नुसार जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथिल करुन मान्यता देणेचे अधिकार मा.स्थायी समितीला असलेने जे निविदा प्रक्रियेत भाग न घेतलेले ५ मक्तेदार आहेत,त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चॅप्टर ५ (२)(२) नुसार मा.आयुक्त यांच्या दि.१८/०८/२०१८ चे टिपणीच्या मान्यतेने मक्तेदार श्री.संजय ज्ञानेश्वर यमपुरे वगळता उर्वरित ४ मक्तेदारांना वर्कऑर्डर देणेत आले आहे.तसेच बंद लिफाफा पध्दतीने निविदा DSR २०१६-१७ + ५ % मनपा क्षेत्र या दरापेक्षा १ % कमी दराने निविदा भरलेले उर्वरित १० मक्तेदारांची मक्ता निश्चित करणेबाबत मा.मुख्यलेखापरिक्षक कार्यालयाकडे मंजूरीस्तव प्रकरण पाठविले असता मा.मुख्यलेखापरिक्षक कार्यालयाने ३ लाखाचे पुढील रक्कमेच्या निविदा प्रकरणी बंद लिफाफा पध्दतीने मागविता येत नसलेचे नमूद केले आहे. परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चॅप्टर ५ (२)(२) नुसार जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथिल करुन मान्यता देणेचे अधिकार मा.स्थायी समितीला असलेने उर्वरित १० मक्तेदारांना (१) श्री.सुशिलकुमार एकबोटे (२) भक्ती मल्टी सर्विसेस ३) श्री.एच.के.माडेकर ४) अंकिता कन्स्ट्रक्शन ५)समी कन्स्ट्रक्शन ६) एस.टी.जाधव कन्स्ट्रक्शन ७) श्री.नागेश गंगाधर उंबरजे ८) पवार अँड पवार असोसिएट ९) वेदांती डेव्हलपर १०) श्री.लंगडे महादेव सिद्रामप्पा ) DSR सन २०१६-१७ + ५ % मनपा क्षेत्र या दरापेक्षा १% कमी दराने नगरअभियंता विभागाकडील विविध देखभाल दुरुस्ती कामे करुन घेणेकामी मक्ता निश्चित करणेस,येणा-या खर्चास,करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी सध्या मा.स्थायी समिती कार्यरत नसल्याने MMC Act ३५ (अ) प्रमाणे मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव मा.आयुक्त यांचे दिनांक १८/८/१८ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रस्तावातील वरील अ.क्र. १ ते १० मधील अ.क्र. ९ वरील वेदांती डेव्हलपर यांचे कागदपत्रे अपुरे असल्याने व सदस्यांच्या त्यांचेबाबत नेहमी तक्रारी येत असल्याने त्यांची संपूर्णपणे चौकशी करुन त्यांचे स्वतंत्र प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे व उर्वरीत ९ मक्तेदार यांचेकडून मक्ता निश्चित करुन येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्क ऑर्डर देणेस मान्यता देणेत येत आहे.

(signature)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २०५ ठ. क्र. ९५६
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२०५

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) २०१८-१९ अंतर्गत प्र.क्र. १७ मध्ये शामसुंदर घर ते दामू परदेशी घर ते रमेश साकी घर ते हकीम शेख घर ते बिलोरीवाले घर ते पिंठाची गिरणी ते विजय बनसी घर ते कय्यावाले घर ते समाज मंदिर पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २८/२०१८-१९ र.रु. ३८,०८,६४३/- चे तयार केलेले असून त्यास मनपा हिस्स्याची ३०% रक्कम उपलब्ध होवून सदरचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) या बजेट मधून करणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १३-९-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

Sd/- P.P.
नगर सचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०६ ठ. क्र....२८०
दि.१२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) २०१८-१९ अंतर्गत प्र.क्र. १७ मध्ये श्री. राकशीनी हॉस्पीटल ते बिलोरीवाले पिठाची गिरणी येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. २९/२०१८-१९ र.रु. ६,८५,७१०/- चे तयार केलेले असून त्यास मनपा हिस्याची ३०% रक्कम उपलब्ध होवून सदरचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) या बजेट मधून करणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १३-९-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०८ ठ. क्र. ९८
दि. २१.१०.१९८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) २०१८-१९ अंतर्गत प्र.क्र. १७ येथे हकीम शेख घर ते मुर्गी नाला भाजी मंडी नाला पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ३०/२०१८-१९ र.रु. ८,११,८९०/- चे तयार केलेले असून त्यास मनपा हिस्स्याची ३०% रक्कम उपलब्ध होवून सदरचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) या बजेट मधून करणेस मा. आयुक्त यांचे दि. १३-९-१८ चे टिपणी प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

(M-32281)

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज.206 ठ. क्र......169
दि. 12.11.2018 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक, संस्था व इतर आस्थापना यांच्याकरिता सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याकरिता घनकचरा व्यवस्थापन व शौचालय व्यवस्थापन महानगरपालिकेकडील उपलब्ध साहित्य साधने सामुग्री आवश्यक ती कार्यवाही केली जाते. शहर स्वच्छ व सुंदर होणेकरीता नागरिकांचीही जबाबदारी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २९ कलम ४५८ नुसार महानगरपालिकेने शहरातील नागरिक निवासी बिगरनिवासी संस्थात्मक उद्योग व्यवसाय आस्थापना इत्यादीकरिता घनकचरा सांडपाणी, गटारी व इतर स्वच्छता विषयी बाबीचे पालन करण्यात येते. पालन न करणा-या व्यक्ती/संस्था यांच्या विरोधात कार्यवाही करणेबाबत सोलापूर महानगरपालिकेची उपविधी ठरवून त्याची प्रशासनाकडून काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सोबत जोडलेल्या मसुद्याचे अवलोकन होऊन यांस मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी अंती जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे नागरिक/संस्था यांचेकडून सूचना/हरकती मागविणेत येतील त्यानंतर अंतीम मसूदा पुन्हा मा. सर्वसाधारण सभेकडे अंतीम मान्यतेस्तव पाठविणेत येईल. यास्तव सोबत जोडलेला उपविधी मसुदा सोलापूर महानगरपालिका, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी-२०१८ यांस प्रस्तावित प्रमाणेस मान्यता देणेकामी मा. आयुक्त यांचे १८-९-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

याबाबत खालीलप्रमाणे समिती गठीत करणेत येत असून, सदर समितीने निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे.

मा. महापौर

मा. उपमहापौर

मा. सभागृह नेता

मा. विरोधी पक्षनेता

(signature) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०६..ठ. क्र.......९५०
दि.१२/१०/१८..रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र.२१-क मध्ये आंबेडकर नगर येथील धोकादायक जुना पाण्याचा सार्वजनिक हौद पाडून नवीन बांधणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद सर्व बाबींचे अवलोकन होऊन प्रकरणी आंबेडकर नगर येथील धोकादायक हौदाचे पाडकाम करुन त्या ठिकाणी नव्याने हौद बांधण्याचे कामास सध्या मा.स्थायी समिती गठीत झालेली नसल्याने,अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३५(अ) अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दिनांक १३/९/१८चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

या हौदातील पाण्याचा वापर हा नागरिकांचे वापरासाठी होतो किंवा कोणत्या कारणासाठी होतो याचा अर्थबोध होत नाही. सबब सविस्तर माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२९१०ठ. क्र......९५१ दि.९२४.१०.१९८..रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सौ अश्विनी किशोर खेडगीकर, रा.७२ ब, मिरा नगर, जुळे सोलापूर यांचे पती किशोर वसंतराव खेडगीकर हे किडनीच्या विकाराने आजारी असून यशोधरा हॉस्पिटलमध्ये ते उपचार घेत आहेत. त्यांच्या किडन्या साधारणपणे ५० टक्के पर्यंत डॅमेज झालेल्या असून त्यांना उपचारासाठी २ ते ३ लाखा पर्यंत खर्च येणार असून पती किशोर खेडगीकर हे बेरोजगार असून त्यांची पत्नी ही गृहीणी आहे. सौ अश्विनी खेडगीकर यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून त्यांना कोणताही आधार नसल्यामुळे त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.299..ठ. क्र.....252
दि.12/10/98...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बेडर समाजाचे आराध्य दैवत शिवभक्त बेडर कण्णप्पा यांची जयंती दरवर्षी महाशिवरात्री या दिवशी बेडर समाजाच्यावतीने मोठया प्रमाणात साजरा करण्यात येत असतो. ब्रिटीश काळापासून लष्कर येथील बेडर पूलाजवळ, शिवभक्त बेडर कण्णप्पा यांची जयंती महाशिवरात्रीच्या दिवशी दरवर्षी सालाबादप्रमाणे भक्तीभावाने साजरा केले जाते. याशिवाय सोलापूर शहरात शास्त्रीनगर, कुंभारगल्ली, इंदिरानगर ( गेंटयाल टॉकीजच्या मागे) मड्डी वस्ती (जुना तुळजापूरनाका ) भैय्याचौक, तसेच सोलापूर जिल्हास्तरावर अक्कलकोट, जेऊर, करजगी, कणमुस वगैरे ठिकाणी शिवभक्त बेडर कण्णप्पाची जयंती दरवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी बेडर समाज बांधवांकडून साजरी करण्यात येत असते. प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मा. महापौर यांचे शुभहस्ते दरवर्षी सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने महाशिवरात्री या दिवशी **शिवभक्त बेडर कण्णप्पा** यांची जयंती निमित्त त्यांचे तैलचित्रास (फोटोस) हार घालून अभिवादन करणेस व त्याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या दैनंदिनीमध्ये कायमस्वरुपी घेणेस व त्याप्रमाणे जयंती साजरी करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालि०

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.आ.292 ठ. क्र. 952
दि. 9/21/10/98 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १ मधील मड्डीवस्ती परिसरात सोलापूर महानगरपालिकेचे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. या आरोग्य केंद्रामध्ये मोठया प्रमाणात लोकांची गर्दी असते. ही आरोग्य केंद्र नुतनीकरणाने पुन्हा सुरु झालेली आहे. परंतु यास मनपा दवाखाना म्हणून ओळखले जाते. परंतु याठिकाणी या केंद्रास पंडित दिनदयाळ उपाध्याय प्राथमिक आरोग्य केंद्र असे नामकरण करणेविषयी मोठया प्रमाणात मागणी येत आहे. सदरची मागणी रास्त असल्याने याठिकाणी पंडित दिनदयाळ उपाध्याय हे नांव देणे योग्य वाटते. तरी सदर मड्डीवस्ती परिसरातील महानगरपालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रास **पंडीत दिनदयाळ उपाध्याय प्राथमिक आरोग्य केंद्र** असे नामकरण करणेस, त्यानुसार नामफलक लावणेस व येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

(sd) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.293 ठ. क्र.......214
दि. 12/10/2018 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२१३

दिनांक २६ ते २८ ऑक्टोबर २०१८ रोजी मलेशिया येथील कुआलालंपूर येथे होणाऱ्या चॅम्पीयनशिप स्पर्धेमध्ये भारतासह नऊ आशियायी देश सहभागी होत आहेत. थ्रोबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने या स्पर्धेकरिता सोलापूरच्या श्री.केशवराज श्रीपाद भडंगे या युवा खेळाडूची निवड करण्यात आली आहे. भारतीय संघात स्थान मिळविलेल्या नऊ जणांमध्ये महाराष्ट्रातील एकमेव खेळाडूची निवड झाली असून तो सोलापूरचा आहे. या निमित्ताने सोलापूरला प्रथमच आंतरराष्ट्रीय स्तरावर थ्रोबॉल स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळत आहे. केशवराज सध्या हिराचंद नेमचंद कॉलेजमध्ये कॉमर्स विभागात प्रथम वर्षात शिकत आहे. बी.एफ.दमाणी प्रशालेत त्याचे शालेय शिक्षण पूर्ण झाले आहे. त्याने आता पर्यंत पाच नॅशनल व चार स्टेट स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. त्याच प्रमाणे आतापर्यंत छत्तीसगड, केरळ, चेन्नई, कर्नाटक, विजयवाडा, रत्नागिरी, औरंगाबाद, बार्शी, तामिळनाडू आदी ठिकाणी झालेल्या थ्रोबॉल स्पर्धेमध्ये केशवराजने सहभाग घेतला आहे. तरी अशा युवा थ्रोबॉल खेळाडूस चॅम्पीयनशिप स्पर्धेमध्ये भाग घेणेसाठी जास्तीत जास्त अर्थसहाय्य मिळणेसाठी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.298 ठ. क्र.....915
दि.12/10/98...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सोमनाथ शिवरुद्रप्पा सावळगी रा.५५/२३ शाहिरवस्ती, सोलापूर यांना नाजुक जागी गॅंगरींग झाले असून त्यांचा इलाज निरामय हॉस्पिटल येथे चालू आहे. त्यावर ऑपरेशन करणेकरीता अंदाजे १.०० लाख इतका खर्च अपेक्षित आहे असे डॉक्टरांनी तोंडी सांगीतले आहे. ते गरीब कुटुंबियातील असून या आजारावरील उपचार करणे अथवा औषधोपचार करणे किंवा ऑपरेशन कारणेकामी त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने ते इतका खर्च करु शकत नाहीत. तेंव्हा वरीलप्रमाणे परिस्थिती पाहता श्री. सोमनाथ शिवरुद्रप्पा सावळगी यांना त्यांचे आजारावरील उपचाराकरीता महापालिकेकडून जास्तीत आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२९५ ठ. क्र....२१६ दि.१२।१०।१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



दि. २३-९-२०११ रोजीच्या मा.स्थायी समिती मध्ये विषय क्र. ६९२ व ठराव क्र.६९२ अन्वये सुंद्रीसम्राट सिद्राम जाधव व पंडित चिदानंद जाधव संगित विद्यालयास सो.म.पा. एक नंबर झोन वरील दोन रुम देणचा ठराव पारित करण्यात आला आहे.परंतु प्रत्यक्षात मात्र उपरोक्त संस्थेला एकच रुम देण्यात आली आहे. त्यामुळे सुंद्रीवादनाचे व संगिताचे धडे घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. दोन रुम देण्याचा ठराव झालेला असतानाही एकच रुम देणे हा संस्थेवर अन्याय झाल्यासारखे असून कलेची गळचेपी झाल्या सारखे आहे. तरी नवीन पिढीला सुंद्रीची ओळख व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये संगिता विषयी प्रेमनिर्माण व्हावे, व संगित कलेला प्रोत्साहन मिळणेसाठी सुंद्रीसम्राट सिद्राम जाधव व पंडित चिदानंद जाधव संगित विद्यालयास मा.स्थायी समितीच्या उपरोक्त ठरावान्वये दोन रुम पैंकी उर्वरित एक रुम नाममात्र भाडे आकारुन देणेसाठी मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२९६ ठ. क्र. १५०
दि. १२/१०/१९८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वरांचे मंदिरा समोरील पंचकट्टा जवळील चौकास श्री सिध्देवर महाराजांचे वडील **पूज्य सिध्दनगौडा चौक** तसेच निर्मलकुमार फडकुले सभागृहा समोरील चौकास श्री सिध्देश्वर महाहराजांच्या आई **पूज्य सुग्गलदेवी चौक** व लक्ष्मी मार्केट जवळील मारुती मंदिर व एमएसईबी समोरील चौकास श्री सिध्देश्वर महाराजांचे भाऊ **पूज्य अण्णा बोम्मय्या चौक** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

श्री. सिध्देश्वर महाराजांचे वडीलांचे नाव **पूज्य मुद्दगौडा चौक** अशी दुरुस्ती करुन या दुरुस्तीसह प्रस्तावात नमूद ठिकाणी नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

(सही) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. तात-१/२१७ ठ. क्र. ...१९८
दि. १२.१०.१८ ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/२१७

स्मार्ट शहरांसाठी केंद्र शासनाकडून आयोजित करण्यात आलेल्या सिटीज चॅलेंज या स्पर्धेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद असून, शहरातील सात रस्ता येथे कोटणीस उद्यान व लगतच्या क्षेत्रामध्ये या योजनेअंतर्गत पालिका बझार करणेचे नियोजन स्मार्ट सिटी कार्यालयाकडून करणेत आले आहे. त्यानअनुषंगाने सदर कामाचे ढोबळ मानाने अंदाज पत्रक र.रु. ४०.०० कोटी इतके होत आहे. त्यातील २० टक्के म्हणजेच र.रु. ८.०० कोटी इतक्या निधीची तरतूद स्मार्ट सिटीच्या प्राप्त निधीतून करणेबाबत मा. संचालक मंडळ स्मार्ट सिटीच्या दिनांक २८-९-२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत चर्चेच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद वस्तुस्थितीचा साकल्याने विचार करता महाराष्ट्र शासनाच्या प्राप्त पत्रान्वये सदर स्पर्धेतील प्रकल्पांकरिता कर्ज घ्यावे लागणार असल्याने या स्पर्धेत सोलापूर शहराने भाग घ्यावा अगर कसे याबाबत धोरणात्मक निर्णय होऊन मिळणेकरिता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस तसेच स्पर्धेत सहभागी होण्याचा कालावधी हा दि. ३१-१०-२०१८ अखेर पर्यंतच असलेने सदरचा विषय दिनांक १२-१०-२०१८ रोजीच्या सभेत तातडीचा विषय निर्णयास्तव ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

स्मार्ट शहरांसाठी केंद्र शासनाकडून आयोजित करण्यात आलेल्या सिटीज चॅलेंज या स्पर्धेत भाग घेणेस व प्रस्तावित प्रमाणे कार्यवाहीसही मान्यता देणेत येत आहे. याकामी मा. शासनाकडे पत्रव्यवहार करणेस मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे. तसेच सदर स्पर्धेत सोलापूर महानगरपालिकेची निवड झाल्यास पुढील कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे या माहितीसह प्रकरण मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत आहे.

(सही)
नगर सचिव,
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.134...ठ. क्र.१८८
दि. १२/१०/१८......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महानगरपालिका सर्वसासधारण रस्ता अनुदान अंतर्गत सन २०१७-१८ अंतर्गत या योजनेअंतर्गत चार रस्ते करणे कामाबाबत जाहिरप्रसिध्दीकरण करुन मुल्यनिविदा मागविले असता एकूण ५ निविदा आलेल्या असून मक्तेदार श्री. डी. एस. टाकळीकर यांच्या मक्त्याच्या रकमेपेक्षा २१.१४% कमी हे दर (मक्त्याची रक्कम रु. ५९,२८,६४३/-) सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे याकामी सर्वात कमीचे दराचे मक्तेदार श्री. डी. एस. टाकळीकर यांचेकडून विषयांकित कामी त्यांनी निविदेत दिलेल्या मक्त्याच्या रक्कमेपेक्षा २१.१४% कमी दराने काम करुन घेणेस, येणारे खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेकामी मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. महानगरपालिकेकडे निर्णयास्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २२-७-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.३३५ ठ. क्र. २००
दि. २१/०८/१८ ...रोजी ठेवला त्यावरील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. पाटील सुर्यकांत सदाशिव, नगरसेवक सोलापूर महानगरपालिका यांनी दिनांक ०३-०८-२०१८ रोजी पत्र देऊन माझी प्रकृती ठिक नसल्यामुळे माहे जून २०१८ पासून महानगरपालिकेच्या विविध सभा व बैठकांना उपस्थित राहू शकलो नाही. सध्या मी पुणे व मुंबई येथे विविध ठिकाणी उपचार घेत असून, मला उपचारासाठी बराच कालावधी लागणार आहे. यामुळे माहे जून २०१८ ते ऑक्टोंबर २०१८ अखेर मी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभांना, शासकीय सभांना बैठकांना व इतर कार्यक्रमांना उपस्थित राहू शकत नाही. तरी मला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार माहे जून २०१८ ते ऑक्टोंबर २०१८ अखेर पर्यंतच्या कालावधीसाठी अनुपस्थीत राहणेकामी परवानगी मिळणेस विनंती केली आहे. दरम्यानच्या काळात माझी प्रकृती ठीक झाल्यास मी नियमीतपणे वरील सभा व बैठकांना व कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहे. असे कळविले आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद कारणास्तव व नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ११ नुसार श्री. पाटील सुर्यकांत सदाशिव, नगरसेवक यांचे दि. ०३-०८-१८ चे पत्राप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेसमोर निर्णयास्तव ठेवणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ०३-०८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

बालापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 136 ठ. क्र. 209
दि. 12/10/18 ...राजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील औषधे रसायने व उपकरणे खरेदी कामी ३० लाखाच्या व श्वानदंश लसीकरणासाठी १० लाख रुपयांची तरतूद करणेत आलेली आहे. त्यातून औषधे खरेदी करणेकामी ई-निविदा प्रसिध्दीकरण करुन २०० प्रकारची औषधे खरेदी करणेकामी दरपत्रके मागविले असता तीन पुरवठाधारकांनी दरपत्रके सादर केलेली आहेत. त्यांनी सादर केलेल्या दरपत्रकांचे तुलना करता सरिता डिस्ट्रीब्युटर्स यांचे ६१ अॅटमचे, जिनोवा बायोटेक यांचे ९९ अॅटमचे व व्यंकटेश्वरा डिस्ट्रीब्युटर्स यांचे ४० अॅटमचे दर कमीचे असल्याचे दिसून आले आहे. सदर खरेदी २५ लाखापेक्षा जास्त असल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक होते. तथापि मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने अधिनियमातील तरतुदीनुसार सदर खरेदीस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असलेने मा. आयुक्त यांच्या मान्यतेने मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी सन २०१८-१९ या सालातील अंदाजपत्रकीय तरतूदीमधून वार्षिक औषध खरेदी करणेकामी ई-निविदा प्रसिध्दीकरण करुन २०० प्रकारच्या औषध व इंजक्शनसाठी पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविणेत आली असता तीन पुरवठाधारकांनी दरपत्रके सादर केलेली असल्याचे दिसून येते.त्यातील सरिता डिस्ट्रीब्युटर्स यांचे ६१ अॅटम जिनेवा बायोटेक यांचे ९९ अॅटमचे व व्यंकटेश्वरा डिस्ट्रीब्युटर्स यांचे ४० अॅटमचे दर कमी असल्याचे दिसुन येते त्यामुळे महापालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने तीनही पुरवठाधारकांमध्ये सर्वात कमीचे दर असलेल्या अॅटमची खरेदी विभागून करणेस व संबंधिताशी करारपत्र करणेस, वर्कऑर्डर देणेस व त्याकामी येणारा खर्च सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील औषध रसायने व उपकरणे खरेदी व श्वानदंश लसीकरण करणेस असलेल्या तरतुदीमधून करणेस, तसेच दि. ८-८-२०१८ रोजी मा.स.स.ची बैठक आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव तातडीचा समजून पुरवणी विषयामध्ये समावेश करणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक ३-८-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(sd/-) P.P.
नगर सचिव
बालापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १३७०ठ. क्र. 202
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रमाणे ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील दिव्यांगाना मा.शासनाच्या योजनेचा लाभ मिळणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरातील दिव्यांगाकरीता मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.११८/नवि.२० मंत्रालय मुंबई यांचे दि.२८ ऑक्टोंबर २०१५ चे परिपत्रकानुसार महानगरपालिकेकडून प्रस्तावात नमूद १ ते १२ योजनेप्रमाणे चालू वर्षात योजना राबविणे शक्य होणार असून,प्रस्तुत प्रकरणी दिव्यांगाना सोयी-सुविधा देणेकामी शासनाने पारित केलेल्या निर्णयानुसार व वेळोवेळी पारित होणा-या निर्णयानुसार कार्यवाही ठेवावी लागणार आहे. सबब सदरकामी सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामधील दिव्यांगाना ३% तरतूद असलेल्या बजेट सदरामधून सदरची योजना राबविणेस, खर्चास, मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत तथापि राज्यातील इतर म.न.पा.च्या योजनांचा अभ्यास करुन ही योजना सादर केली असून, **अ.क्र.१३ -** दिव्यांगासाठी मनपाच्या मंडईमधील ओटे आरक्षित ठेवण्यात यावेत व त्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये. **अ.क्र.१४-** दिव्यांगासाठी म.न.पा.चे जलतरण तलावात पोहोण्यासाठी (Swimining pool ) साठी शुल्क माफ करण्यात यावे. वरील प्रमाणे दुरुस्तीसह प्रस्ताव मा.स.स.कडे मान्यतेस्तव सादर करणेस, मंजूरीनंतर याबाबतचे प्रशासकीय आदेश संबंधित विभागांना देण्यात येतील तरी सदरचा विषय तातडीचा असल्याने दि. ८/८/२०१८ रोजीच्या मा.स.स.समेसमोर मंजूरीस्तव सादर करणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक ४/८/२०१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मसनुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. 36 ठ. क्र. 203
दि. 24/10/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका करिता १४ वे वित्त आयोग (घनकचरा व्यवस्थापन) अंतर्गत प्राप्त अनुदानातून घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील वाहन दुरुस्ती कार्यशाळा (साखर पेठ) येथे कॉंक्रीटीकरण करणेचे कामासाठी र.रु. ८२,४२,६४१/- इतक्या रक्कमेचे पूर्वगणनपत्रक तयार करणेत आलेले असून, यांस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २५-७-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 23e...ठ. क्र. 208
दि. 12/10/18.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१३९

१३ कोटी वृक्ष लागवड अंतर्गत रोपे खरेदीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरची रोपे खरेदी करणेस,तसेच सदरच्या १५,००० रोपे पैकी जाहिर प्रसिध्दीकरणाने मागविणेत आलेल्या सर्वात कमीच्या दराचे मक्तेदाराकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.शासनाने ठरवून दिलेल्या उध्दीष्टाप्रमाणे लागवडीकामी तातडीने ८००० रोपांची खरेदी करणेत आलेली आहे.या खरेदीबाबतची माहिती सादर करणेस व उर्वरित ७०००रोपे खरेदी करणे आवश्यक असून प्रकरणी मागविलेल्या मुल्यनिविदेतील दराने खरेदी करणेकामी प्रस्तावित प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालका अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) प्रमाणे मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दिनांक ५/७/२०१८ चे टिपणीनुसार, मा.अतिरिक्त आयुक्त यांचे दिनाक ४/८/१८चे टिपणीत प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १८० ठ. क्र. २०५ दि. १२/२०१८... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र. ११ मध्ये साई नगर येथील हमीद पटेल यांचे घरासमोरील चौकास
हुतात्मा चौक, अभिषेक नगर-ब येथील राष्ट्रसंत शाळा शेजारील **क्रांती चौक,** किर्ती नगर येथील।
बवलाद घरासमोरील चौकास **बसवेश्वर चौक,** किर्ती नगर येथील इस्माईल कादरी दर्गा शेजारील
चौकास **विरभद्रेश्वर चौक,** रमण नगर येथील लिंबीतोटे यांच्या घराशेजारील चौकास **महालक्ष्मी**
**चौक,** भवानी नगर येथील येरवडकर यांच्या घरासमोरील चौकास **तुळजाभवानी चौक,** साई नगर
येथील मोहमद मंगल भांडार समोरील चौकास **साई चौक,** गणेश नगर, अभिषेक नगर येथील
सुलतान दुकानासमोरील चौकास **गणेश चौक,** किर्ती नगर व अभिषेक नगर देसाई यांच्या घरासमोर
चौकास **बेडरकन्हय्या चौक** असे नामकरण करण्यास व नामफलक लावण्यास व येणा-या खर्चास
मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९१४९ ठ. क्र. ...२०६
दि. ११/१०/१९८..रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



पोलीस हेडक्वॉर्टर समोरील स्विमिंग टँक शेजारील जागेमध्ये एम.पी.एस.सी. सारख्या स्पर्धा परिक्षेसाठी बांधण्यात आलेली ग्रंथालयाची जागा सध्या बांधून पूर्ण झालेली आहे. सदर सर्व्हे नंबर वरील जागेमध्ये हिंदु-हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मृती व स्मारकाकरिता जागा देण्यांत आलेली आहे. सदर सर्व्हे नंबर मधील बांधण्यात आलेली इमारत ही बाळासाहेब ठाकरे स्मारक समितीकडे वर्ग करणेस व त्या ठिकाणी करावयाची उर्वरीत कामे लवकरात लवकर पूर्ण करणेस व याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मुलतवी/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९८ ठ. क्र. 200
दि. २४/१०/९८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



इक्बाल बाबूमियाँ सय्यद, राहणार २२१, संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर यांचा मुलगा नुरमहमद इक्बाल सय्यद याला Buccul Mucosa चा आजार असून, त्याला सोलापूर कॅन्सर सेंटर येथे उपचार चालू आहेत. डॉक्टरांनी औषध उपचार व ऑपरेशन करणेसाठी र.रुपये २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले आहे. इक्बाल बाबूमियाँ सय्यद यांची घरची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत गरिबीची असून, रोज मोल मजूरी करुन, स्वतःचा व स्वतःचा कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. संपूर्ण कुटूंबाची जबाबदारी ही इक्बाल बाबूमियाँ सय्यद यांच्यावरच आहे. सोबत दवाखान्याची कागदपत्रे जोडलेली आहे. तरी नुरमहमद इक्बाल सय्यद यांना Buccul Mucosa चा आजार असलेने त्यांना औषध उपचार व ऑपरेशन करणेसाठी महानगरपालिकेच्या फंडातून जास्तीत जास्त आर्थिक मदत करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१४३ ठ. क्र. २०८
दि. ११/१०/१९८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१४३

सोलापूरच्या हद्दवाढ भागामध्ये आज मोठया प्रमाणात मुस्लीम बांधव वास्तव्य करीत आहेत. त्या नागरिकांचे अंत्यविधीसाठी सुमारे पाच ते सहा किलो मिटर लांब जावे लागते. अंत्यविधीनंतर एवढया लांब अंतरावर त्यांचे शव खांद्यावर घेऊन जाणे हे अवघड होत आहे. मुस्लीम समाजातील लोकांचे ज्या त्या स्मशानभूमीमध्ये घेऊन जावे लागते. यासाठी पुणे शहरामध्ये जसे अंत्यविधीसाठी एका बसची सोय करण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे त्या बसमध्ये शव व मयतीला जाणारे नागरिकही बसू शकतील त्याच धर्तीवर मुस्लीम बांधवांच्या समाजोपयोगी कार्यासाठी आपल्या सोलापूर शहरातही एका बसची सोय करण्यांस तद्अनुषंगीक येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव
महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.९८८ ठ. क्र........२०९
दि.१२/१०/१९८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१४४

आकाशवाणी सोलापूर केंद्रापासून निलम नगरकडे जाणा-या मार्गावर गवळी वस्ती येथे चौक असून चौकातील एक रस्ता एम.आय.डी.सी.कडे जातो तर दुस-या बाजूला गवळी वस्तीमार्गे रविंद्र नगरकडे रस्ता जातो. या चौकास गवळी वस्ती चौक म्हणून ओळखले जाते. तरी सोलापूर महानगरपालिकेकडून सदर चौकास **गवळी वस्ती चौक** असे नामकरण करण्यास व नामफलक लावण्यास तसेच येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 98.4 ठ. क्र........290
दि. 24.10.18....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१४५

हावडा, पश्चिम बंगाल येथे दिनांक २९ नोव्हेंबर २०१८ ते २ डिसेंबर २०१८ अखेर इंटरनॅशनल ड्रामा फेस्टीव्हल १८ चे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टीव्हलमध्ये यु.पी.,राजस्थान, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश,, जम्मू काश्मिर, ओरीसा आदी राज्यातील नाट्यसंस्था सहभागी होणार आहेत. सदरील फेस्टीव्हलची यादी या प्रस्तावा सोबत जोडण्यात आलेली आहे. सदरचे ड्रामा फेस्टीव्हल २०१८ चे आयोजन अंकुर नाट्य संस्था करीत आहे. या फेस्टीव्हलमध्ये महाराष्ट्रातून एकमेव नाट्यसंस्थेने सहभाग घेतला असून ती सोलापुरातील नक्षत्र थिएटर या संस्थेच्यावतीने एकांकीका सादर होणार आहे. त्यात जवळपास १४ कलावंत व तंत्रज्ञांचा सहभाग असणार आहे. अंदाजे जवळपास र.रु.२.०० लाख खर्च अपेक्षीत आहे. नक्षत्र थिएटरच्या सहभागाने सोलापूरचे नांव संपूर्ण भारतात उज्वल होणार असल्याने सदरील संस्थेस महानगरपालिकेच्यावतीने जास्तीत जास्त अर्थसहाय्य देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज१४६..ठ. क्र.......२९१ दि.१२/१२/२०१८......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील स्क्रॅप ३४ बसेस व १ जीप विक्रीकामी सन २०१६ मध्ये जाहिरप्रसिध्दीकरण करणेत आलेले होते. रितसर ई-टेंडरिंग प्रक्रिया पूर्ण केले असता तिसऱ्या वेळेस ई-टेंडरिंगच्या मुदतीअंती मे. मुच्छाले ट्रेडर्स सोलापूर यांचे एकच निविदा प्राप्त झालेले होते. यामुळे त्यांचे नांवे सदर वाहन विक्रीचा मक्ता मंजूर करण्यात आलेला होता. ३४ स्क्रॅप बसेस व १ जीप विक्रीची एकूण किंमत रू. ७०,६३,६२९/-इतके जसजसे सामान उचलण्यात येईल, त्यानुसार त्याच्या किंमतीच्या २०% अधिक रक्कम भरून ७ टप्यात सर्व सामान उचलणे जरूरीचे होते. परंतु मे. मुच्छाले ट्रेडर्स, सोलापूर यांनी दि. १८/०५/२०१६ रोजी प्रथम टप्यातील रक्कम रू. ११,६५,०००/- इतके भरून सामान उचललेले आहे. परंतु उर्वरित रक्कम रू. ५८,९८,६२९/- भरलेले नाही. तसेच उर्वरित सामानांचीदेखील डिलीव्हरी घेतलेली नाही. याबाबत अनेकवेळा मे. मुच्छाले ट्रेडर्स, सोलापूर यांचेसमवेत पत्रव्यवहार केलेला आहे. तथापि त्यांनी यास प्रतिसाद दिलेला नाही. परंतु दि. २१/०५/२०१८ व दि. २८/०६/२०१८ रोजी पत्र देवून परिवहन उपक्रमाकडून मक्ता देण्यास विलंब केलेला आहे. यामुळे बाजारातील स्क्रॅप सामानांची किंमत कमी होवून माझे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच विलंबाने मक्ता मंजूर केल्याने परिवहन उपक्रमाकडे राहिलेल्या सामानांची मोठया प्रमाणात चोरी झाल्याने यामध्येदेखील नुकसान झालेले आहे. तसेच पुढील न्यायालयीन कार्यवाहीसाठी होणारा खर्च, वेळेचा अपव्यय टाळणे व परिवहन उपक्रमाकडून माझे नांव काळया यादीत जावू नये, सदर बाबी टाळण्यासाठी मी सदर स्क्रॅप सामानांची किंमत अंदाजे रू. ३० लाख इतकी असताना रू. ४२ लाख इतक्यास घेण्यास तयार असलेबाबत पत्र दिले असता मा. परिवहन व्यवस्थापक यांनी या पत्राच्या अनुषंगाने दि. १८/०७/२०१८ रोजी मा. कंडमनेशन बोर्डाची बैठक आयोजित केलेली असून सदर बैठकीसाठी मा. अध्यक्ष तथा परिवहन व्यवस्थापक, मा. सदस्य तथा मुख्यलेखापरिक्षक, सदस्य तथा कर्मशाळा व्यवस्थापक व सदस्य तथा कार्यालय अधिक्षक नि लेखापाल हे उपस्थित होते. सदर बैठकीदरम्यान सर्व वाहनांची समक्ष यांत्रिकदृष्टया तपासणी केली. सध्या असलेल्या सर्व वाहनांची तांत्रिक अधिकारी (इंजिनिअर्स) यांनी मुल्यांकन केले असता त्याची अंदाजे किंमत रू. २७ ते ३० लाख इतकी होत असल्याने सदर स्क्रॅप सामानांची विक्री मे. मुच्छाले ट्रेडर्स, सोलापूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार रक्कम रू. ४२ लाख इतक्यास फेरविक्री किंमत ठरवून डिलीव्हरी देणेबाबत मा. परिवहन व्यवस्थापक यांनी मे. मुच्छाले ट्रेडर्स सोलापूर यांनी दि. २१/०६/२०१८ व दि. २८/०६/२०१८ रोजी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून स्क्रॅप ३४ बसेस व १ जीप विक्रीतील उर्वरित सामानांची फेर किंमत रक्कम रू. ४२ लाख इतक्यास विक्री करणेस मा. परिवहन समिती मार्फत, प्रकरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३४५ (ड) अन्वये मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक २-८-१८ चे टिपणी प्रमाणे मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेकामी मा. परिवहन समिती ठराव क्र. १४, दिनांक ४-८-२०१८ व मा. परिवहन समिती ठराव क्र. ३४, दिनांक २९-९-२०१८ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मुदतीची/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९४७ ठ. क्र. २९२
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



नवी मुंबई महापालिकेतून सोलापूर महानगरपालिकेत बदलीने सेवा वर्ग करणेबाबत श्री. बाबासाहेब प्रल्हाद माने, शिपाई, नवी मुंबई मनपा, यांचा विनंती अर्जाबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात सविस्तर माहिती नमूद केली असून श्री. बाबासाहेब माने, शिपाई नवी मुंबई महानगरपालिका यांची नवी मुंबई मुंबई महानगरपालिकेमधील शिपाई पदाची वेतनश्रेणी व सोलापूर महानगरपालिकेमधील शिपाई पदाची वेतनश्रेणी समान आहे तसेच शिपाई हे पद सरळसेवेचे पद आहे. आजला सोलापूर महानगरपालिकेमध्ये शिपाई पदे रिक्त असल्याने श्री. बाबासाहेब माने, शिपाई, नवी मुंबई महानगरपालिका यांना सोलापूर महानगरपालिकेच्या शिपाई पदावर सेवा बदलीने वर्ग करावयाची झाल्यास प्रथमतः मा. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे व सभेच्या मान्यतेअंती सदरच्या प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब श्री. बाबासाहेब माने, शिपाई नवी मुंबई महानगरपालिका यांची सेवा बदलीने सोलापूर महानगरपालिकेत वर्ग करणेकामी मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १८-५-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकुब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 145 ठ. क्र. 293
दि. 12/10/18 ......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधक, मुंबई यांचेकडील पत्रात ॲप्रोटेक निओनेटल रेस्पीरेटर्स मशिन पेटेटंड असून, या यंत्राचे एकमेव उत्पादक मे. ॲप्रोटेक इंडिया, हैद्राबाद हे एकमेव असून, सदरचे यंत्र हे जीवरक्षक असल्याने सदर मशिन खरेदी करणेकामी ई-निविदाद्वारे दर मागविणेसाठी जाहिर प्रसिध्दीकरण करणे व करारपत्र करुन वर्कऑर्डर देणे यामध्ये कालापव्यय होणार असल्याने उत्पादक कंपनी मे. ॲप्रोटेक इंडिया हैद्राबाद यांचेकडून तीन नग मशिन खरेदी करणेस व याकामी र.रु. २४,९९,९००/- इतका खर्च (जी.एस.टी.सह) येणार आहे. त्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यता मिळावी. सदर खरेदीस मा. जिल्हाधिकारी तसेच सदस्य सचिव जिल्हा नियोजन व विकास मंडळ यांचेकडील जा.क्र./नियोजन/जिवायो/प्रमा निवी/२०१७-१८/ससं १/२०१७/२००९ च्या प्रशासकीय मान्यता व निधीवितरण आदेशात सदर कामी २५ लाख रुपयाचा निधी उपलब्ध करुन आलेला आहे. तथापि मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने व शासनाकडील निधी व्यपगत होवू नये म्हणून जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील करणेस चॅप्टर ५ (२) (२) अन्वये मा. स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता प्रस्तावित करणे योग्य ठरणार असल्याने त्यास मा. आयुक्त यांनी दि. २०-३-२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरच्या मशिनची खरेदी करण्यात आली आहे. मा. स्थायी समितीची अद्याप कार्योत्तर मंजूरी न मिळाल्यामुळे पुरवठाधारकास मशिनरीची रक्कम आदा करणेस अडथळा निर्माण झाला होता. बिलाची रक्कम मिळणेबाबत पुरवठाधारकांकडून वारंवार तगादा होता त्यामुळे मा. आयुक्त यांच्या मान्यतेने एकूण बिलाच्या ८० टक्के रक्कम पुरवठाधारकांस आदा करणेत आलेली आहे. अद्याप मा. स्थायी समिती अस्तित्वात आलेली नाही त्यामुळे मा. स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेता आलेली नाही. त्यामुळे सदरचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा. सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १७-६-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १४८ ठ. क्र. २१४
दि. १२/१०/१९ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

मनपा क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधा योजने अंतर्गत प्र.क्र.१७ सरस्वती तालीम ते जेम्स जंगम यांच्या ऑफिस पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे कामाबाबत जाहिर प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविता तीन निविदा आलेले असून पात्र मक्तेदार महालिंगेश्वर कन्स्ट्रक्शन यांचे एस्टीमेंट दराने ( मक्त्याची र.रु.१८,०१,५८४/-) असून त्यामुळे सदरचे काम मक्तेदार महालिंगेश्वर कन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांनी दिलेल्या एस्टीमेंट दराने करुन घेणेस येणा-या खर्चास व सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयाने जा.क्र./साआअ/जनि/२५९ दि.०२/०६/२०१८ ने दिलेल्या वर्क ऑर्डरची माहिती मा.स्थायी समिती सभापती निवड प्रक्रिया न्यायप्रविष्ठ असलेने व त्यावर आजमितीस कोणताही निर्णय न झाल्याने सदरचे प्रकरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कामकाजाच्या विधिग्राह्यतेसंबंधी तरतूदी या प्रकरणातील कलम ३५ (अ) अंतर्गत महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्ये पार पाडणे या कलमाचे तरतूदीनुसार सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.०८-०७-२०१८ टिपणीने आलेल्या वर्कऑर्डरची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

. . . इंडिया, हैद्राबाद हे एकम

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१५० ठ. क्र. २९५
दि. ९२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५०

मनपा क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधा योजने अंतर्गत प्र.क्र.१० सग्गम नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामाबाबत जाहिर प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविता चार निविदा आलेले असून पात्र मक्तेदार अंकिता कन्स्ट्रक्शन यांचे मक्त्याच्या दरापेक्षा ( मक्त्याची र.रु.६,३४,३८७/-) २५% कमी असून ते सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे सदरचे काम सर्वात कमी दराचे मक्तेदार अंकिता कन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांनी दिलेल्या मक्ता दरापेक्षा २५% कमी दराने करुन घेणेस येणा-या खर्चास व सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयाने जा.क्र./साआअ/जनि/३६ दि.११/०४/२०१८ ने दिलेल्या वर्क ऑर्डरची माहिती मा आयुक्त यांचे आदेशानुसार सदरचे प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कामकाजाच्या विधिग्राह्यतेसंबंधी तरतूदी या प्रकरणातील कलम ३५ (अ) अंतर्गत महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्ये पार पाडणे या कलमाचे तरतूदीनुसार सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.०८-०७-२०१८ टिपणीने आलेल्या वर्कऑर्डरची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सदस्य/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. नवि/५९/ठ. क्र. २९६ दि. २५/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



राज्यातील अल्पसंख्यांक बहुल नागरी विकास क्षेत्रात नागरी सुविधा योजने अंतर्गत प्र.क्र.२ शेळगी गावठाण येथील मस्जिद शेजारील भागात ड्रेनेज लाईन टाकणे कामा बाबत जाहिरप्रसिध्दीकरण करुन निविदा मागविता तीन निविदा आलेले असून पात्र मक्तेदार श्रध्दा कंन्स्ट्रक्शन यांचे एस्टीमेट दरापेक्षा ९.९९% कमी दराने ( मक्त्याची र.रु.९,०१,३३४/-) असून ते सर्वात कमीचे आहेत. त्यामुळे सदरचे काम सर्वात कमी दराचे मक्तेदार श्रध्दा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून त्यांनी दिलेल्या एस्टीमेट दरापेक्षा ९.९९% दराने (मक्त्याची र.रु.९,०१,३३४/-) करुन घेणेस येणा-या खर्चास व सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयाने जा.क्र./साआअ/ जनि/१४९३ दि.२३/०३/२०१८ ने दिलेल्या वर्क ऑर्डरची माहिती मा आयुक्त यांचे आदेशानुसार सदरचे प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कामकाजाच्या विधिग्राह्यतेसंबंधी तरतूदी या प्रकरणातील कलम ३५ (अ) अंतर्गत महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्ये पार पाडणे या कलमाचे तरतूदीनुसार सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.०८-०७-२०१८ टिपणीने आलेल्या वर्कऑर्डरची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकूब/प्रमुखी/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.जनि/१२.ड. क्र...२२७
दि.१२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मनपा क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधा योजने अंतर्गत प्र.क्र.०५ शिवाजी नगर बाळे येथे ड्रेनेज लाईन टाकणे कामाबाबत जाहिर प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविता चार निविदा आलेले असून पात्र मक्तेदार मोरया कन्स्ट्रक्शन यांचे मक्त्याच्या दरापेक्षा ( मक्त्याची र.रु.१८०१६९२/-) २५% कमी असून ते सार्वात कमीचे आहेत. त्यामुळे सदरचे काम सर्वात कमी दराचे मक्तेदार मोरया कन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांनी दिलेल्या मक्ता दरापेक्षा २५% कमी दराने करुन घेणेस येणा-या खर्चास व सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयाने जा.क्र./साआअ/जनि/११७ दि.०३/०५/२०१८ ने दिलेल्या वर्क ऑर्डर माहिती मा आयुक्त यांचे आदेशानुसार सदरचे प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कामकाजाच्या विधिग्राह्यतेसंबंधी तरतूदी या प्रकरणातील कलम ३५ (अ) अंतर्गत महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकाराचा वापर करणे व तिची कर्तव्ये पार पाडणे या कलमाचे तरतूदीनुसार सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.०८-०७-२०१८ टिपणीने आलेल्या वर्कऑर्डरची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

...लिकेच्या तहकब/मामुलो/विषय

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकब/मामुलो/विषय
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 153 ठ. क्र. 275
दि. 12/10/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५३

सोलापूर महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राकरिता सन २०१८-१९ किंवा मालाचा संपूर्ण पुरवठा होईपर्यंत ८० मेट्रीक टन पी.ए.सी. पावडर (पॉली अॅल्युमिनीयम क्लोराईड) खरेदी करणेबाबत जाहिर प्रसिध्दीकरणाने ई-निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याची सर्वात कमीचे दराचे निविदाधारक एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन पुणे हे आहेत. त्यांनी आपल्या निविदेमध्ये प्रती मे.टनास र.रु. ३९,०००/- याप्रमाणे दर दिला असून ८० मेट्रीक टनास र.रु. ३१,२०,०००/- एवढा दर दिला आहे. मा. आयुक्त यांच्या समवेत झालेल्या वाटाघाटी दरम्यान एस.व्ही.एस.केमीकल कॉर्पोरेशन यांनी सदर मालाचा पुरवठा हा प्रति मेट्रीक टनास र.रु. ३७,९००/- म्हणजेच ८० मेट्रीक टनास र.रु. ३०,३२,०००/- एवढया दराने पी.ए.सी.पावडरचा पुरवठा करण्यास तयार आहे असे लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार एस.व्ही.एस.केमीकल कॉर्पोरेशन पुणे यांचेकडून पी.ए.सी. पावडर खरेदी करणेस व येणा-या खर्चास, योग्य त्या रक्मेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन घेणेस, सुरक्षित रक्कम भरुन घेणेस व वर्कऑर्डर देणेस मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सध्यस्थितीत मा. स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक प्रक्रिया न्याय प्रविष्ठ असल्याने सदर प्रकरण मुं.प्रां.अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) अन्वये मा. स्थायी समिती गठीत नसताना मा. स्थायी समितीचे अधिकार मा. सर्वसाधारण सभेस असल्याने सदर प्रकरण मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक ९-८-१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १५४/१७९ ठ. क्र. 299
दि. 9/21/10/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५४/१७९

**विषय क्र. १५४ व १७९ दोन्ही एकत्रीत करुन खालीलप्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.**

करंजकर विद्यालय ही सोलापूरातील १९४ वर्षे पूर्ण केलेली व आजतागायत नावाजलेली प्राथमिक शाळा आहे. शिक्षण प्रसारणाचे ध्येय ठेवून शिक्षणाप्रती जीवन वाहिलेल्या गरीब समाजाची ही शाळा आहे. त्यामुळे आजपर्यंत शाळेला स्वत:ची जागा नाही. नगरेश्वर मंदिर, तुळजापूरवेस सोलापूर यांच्या जागेतील भाडेतत्वावरील खोल्यात ही शाळा भरते. ज्यामध्यें ७०% विद्यार्थी मागास समाजातील आहेत. शाळेपासून जवळच असलेली म.न.पा.प्राथमिक शिक्षण मंडळाची जय भवानी शाळेची रिकामी इमारत विद्यार्थ्यांअभावी बंद स्थितीत आहे. सदर इमारत म.न.पा.नियमानुसार योग्य व चालू भाडेतत्वावर करंजकर विद्यालयास मिळाल्यास सदर इमारतीचे व परिसराचे नंदनवर होईल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन अधिक सुसह्य होईल. तरी करंजकर विद्यालयास सदरची जागा भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबत मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

करंजकर विद्यालय ही सोलापूरातील १९४ वर्षे पूर्ण केलेली व आजतागायत नावाजलेली प्राथमिक शाळा आहे. शिक्षण प्रसारणाचे ध्येय ठेवून शिक्षणाप्रती जीवन वाहिलेल्या गरीब समाजाची ही शाळा आहे. त्यामुळे आजपर्यंत शाळेला स्वत:ची जागा नाही. नगरेश्वर मंदिर, तुळजापूरवेस सोलापूर यांच्या जागेतील भाडेतत्वावरील खोल्यात ही शाळा भरते. ज्यामध्ये ७०% विद्यार्थी मागास समाजातील आहेत. या शाळेपासून जवळच असलेली म.न.पा.प्राथमिक शिक्षण मंडळाची कन्नड शाळा क्रं.५ ची रिकामी इमारत विद्यार्थ्यांअभावी बंद स्थितीत आहे. इमारत बंद असल्यामुळे येथे इमारतीचा गैरवापर होऊन येथील दरवाजे, खिडक्या, फरश्या आदी साहित्याची चोरी झालेली आहे. सदर इमारत म.न.पा.नियमानुसार योग्य व चालू भाडेतत्त्वावर करंजकर विद्यालयास मिळाल्यास सदर इमारतीचे व परिसराचे नंदनवन होईल व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन अधिक सुसह्य होईल. तरी करंजकर विद्यालयास मनपा कन्नड शाळा क्रं.५ ची जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१५५ ठ. क्र. 220
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५५

७० फूट रोड भाजी मंडई या ठिकाणी अवैद्य भाजी विक्रेत्यांची अतिक्रमणामुळे रहदारीस व नागरिकांना ये-जा करणे अडचणीचे व त्रासाचे होत आहे. त्यामुळे याठिकाणी अतिशय वर्दळ निर्माण झालेली असते. अशा वर्दळीत श्री. रमेश विटकर या गरीब कुटूंबियाचा मुलगा मुर्ती रमेश विटकर वय १२ वर्षे राहणार १८ भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर याचे अपघाती मृत्यू झाला. श्री. रमेश विटकर हे यंत्रमाग कामगार असून पोटचा मुलगा अपघाती मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटूंबियांवर मोठा आघात झाला आहे. तेव्हा वरीलप्रमाणे परिस्थिती पाहता श्री. रमेश विटकर यांना त्यांचे वरीलप्रमाणे झालेले मुलाच्या अपघातील मृत्युमुळे नैसर्गीक नुकसान भरपाई म्हणून त्यांना महापालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/खास/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. 945 ठराव क्र. 229 दि. 12.10.19 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१५६

प्रभाग क्र. १० मध्ये संभाजीराव शिंदे शाळे समोर विडी घरकूल पोलीस चौकीलगत सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने दवाखाना बांधण्यात आलेला असून सदर दवाखान्यास **राजेश कोठे दवाखाना** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ज.प्र.५५ ठ. क्र. ...222
दि. २४.१०.१८ ... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



दिनांक ५ ऑगस्ट २०१८ रोजी प्र.क्र. १९ मधील विनायक नगर येथील नरसय्या लच्छमय्या सामल यांच्या राहत्या घरी शॉक सर्किटमुळे आग लागली होती. ज्यामध्ये संसारोपयोगी वस्तूंसह गॅस शेगडी, टीव्ही, कुलर, गोदरेज कपाट व रोख रक्कम ५,०००/- जळून खाक झाले आहेत. श्री.सामल यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून ते कारखान्यात मोलमजुरी करुन कुटूंबाची गुजराण करतात. अचानक कोसळलेल्या या संकटामुळे सामल कुटूंबियांची मानसिकता ढासळलेली आहे. जवळपास लाखभर रुपयांचे नुकसान या दुर्घटनेत झाल्याचे समजते. तरी श्री.लच्छमय्या सामल यांना महानगरपालिकेच्यावतीने जास्तीत जास्त अर्थसहाय्य देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १५ ठ.क्र. 223
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता झालेला प्रो. ठराव
एकमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या नवीन प्रभाग क्र. १० व ११ मधील विडी घरकूल परिसरातील पोशम्मा चौकातील युनिक टाऊन समोरील भागात म.न.पा.च्या वतीने उद्यान उभारण्यात आलेले आहे. सदर उद्यानास **विष्णूपंत (तात्या) कोठे उद्यान** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१५६ ठ. क्र. 228
दि.१२.१०.१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्रीमती सरिता श्रीनिवास कट्टा वय वर्ष ४९ राहणार, १८५५, दाजी पेठ, सोलापूर यांना किडनीचा आजार झाला असून त्यांची किडनी ट्रान्सप्लांट केली आहे. त्यांच्यावर यशोधरा सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल सोलापूर येथे उपचार चालू आहेत. सदर आजारावर उपचार करणेकरीता कर्ज काढून उपचार करण्यात आलेले आहे. त्यांना किडनी वरील उपचारासाठी नऊ लाख रु खर्च आला आहे. श्रीमती सरिता श्रीनिवास कट्टा यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाकीची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचें अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

Parkale P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६०.ठ. क्र....२२५
दि.१२/१०/१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्रीमती कल्पना सतीश पलगंटी, रा.सोलापूर यांचे पती कै.सतीश ना.पलगंटी यांचे दि.१४/३/२०१८ रोजी मेंदूच्या रक्तस्त्रावाने अचानक निधन झाले आहे. त्यांना दोन मुले आहेत. त्यांच्या पतीचे ब्रेन डेड झाले असे त्यांना कळाल्यावर त्यांनी त्यांच्या पतीच्या दोन किडन्या, एक लिव्हर हे अवयव दान केले आहेत. कै.सतीश ना.पलगंटी हे आचानक मयत झाल्याने त्यांच्या कुटुंबाचा आधार गेला आहे. श्रीमती कल्पना सतीश पलगंटी यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून त्यांना कोणताही आधार नसल्यामुळे त्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १६१.ठ. क्र....२२६ दि. २५.१०.१८... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सिध्दराम भिमाशंकर कंदलगावकर (स्वामी) यांचे ११०७, उत्तर कसबा, पडत गल्ली सोलापूर रहाते घर दिनांक १४-४-२०१८ रोजी पहाटे मुसळधार पावसामुळे घराच्या भिंती व इमारत कोसळली आहे. यामध्ये त्यांचे प्रापंचिक सामान, टी.व्ही. कपाट यांचे नुकसान झाले आहे. श्री. सिध्दराम भिमाशंकर कंदलगांवकर (स्वामी) यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून ते सध्या बेघर झाले आहेत. तरी श्री. सिध्दराम भिमाशंकर कंदलगांवकर (स्वामी) यांना सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६२ ठ. क्र....२२१०
दि.१२.१०.९८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



दिपाली धनंजय शेटे वय वर्ष ३० राहणार उपळाई बु.ता.माढा जि. सोलापूर यांना ब्लड कॅन्सर हा आजार झाला असून त्यांच्यावर दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल पुणे येथे उपचार चालू आहेत. सदर आजारावर उपचार करणेकरिता कर्ज काढून उपचार करण्यात आलेले आहे. त्यांना कॅन्सरवरील उपचारासाठी दहा लाख रु. खर्च आला आहे. दिपाली धनंजय शेटे यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाकीची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६३ ठ. क्र. 22८
दि. 2५.१०.१८ ...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. १६३

श्री. इरप्पा कासप्पा कलशेट्टी वय वर्ष ५२ राहणार, संगमेश्वर कॉलेज वॉचमन क्वॉर्टर्स, सातरस्ता सोलापूर यांना ब्रेन कॅन्सर हा आजार झाला असून त्यांच्यावर डॉ. आनंद मुदकण्णा यांचे न्युरो स्पर्ष केअर सेंटर रेल्वे लाईन्स, सोलापूर येथे उपचार चालू आहेत. सदर आजारावर उपचार करणेकरिता कर्ज काढून उपचार करण्यांत आलेले आहे. श्री. इरप्पा कासप्पा कलशेट्टी यांची घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची व हालाकीची असल्यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत मिळणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.964..ठ. क्र.....229
दि.12/10/2018...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सो.म.पा.प्रभाग क्र. १३ अशोक चौक येथील आरक्षण क्रमांक ६/३ ही जागा गार्डनसाठी आरक्षित आहे तथापि सदर आरक्षित जागेमध्ये सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक शौचालय बांधण्यात आलेले आहेत. सदरचे शौचालय हे सध्या बंद अवस्थेत असून त्याचा वापर होत नाही. तसेच या शौचालयाच्या बाजूलाच सुलभ शौचालय बांधण्यात आलेले असल्याने या सार्वजनिक शौचालयाची आजला आवश्यकता नाही. प्रस्तावात नमूद कारणास्तव सबब सदर जागेत बगीचा विकसीत करुन त्याठिकाणी लहान मुलांसाठी खेळणी तसेच वृध्द लोकांसाठी वॉकिंग ट्रॅकची व्यवस्था करणेस, आरक्षणाप्रमाणे गार्डन/सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६५ ठ. क्र. .....230
दि. ११/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. १६५

हरिभाऊ तोरणे गुरुजी हे फॉरेस्टमधील धोत्रीकर चाळीमध्ये रहात होते. प्रस्तावात नमूद कारणास्तव ते रहात असलेल्या फॉरेस्टमधील धोत्रीकर चाळीजवळील रस्त्याला **हरिभाऊ तोरणे गुरुजी मार्ग** असे नांव देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मान्मुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १६६ ठ. क्र. 239
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (पार्क चौक) येथे सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविणेत आलेल्या पुतळयाचे सुशोभिकरण करणे व नविन पुतळा बसविणेबाबत **१)** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तीन ठिकाणी क्रॅक झालेला आहे. तो नविन बसविणेत यावा. **२)** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर सुशोभिकरण करणे. **३)** १४ एप्रील, धम्मचक्र परिवर्तन व ६ डिसेंबर अन्य दिवशी अभिवादन करणेसाठी याठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होते. पुतळयाच्या मागील बाजूस असणारी जागा म्हणजे नॉर्थकोट हायस्कूल येथील जागा शासनाकडून अॅक्वॉयर करुन सदरचा पुतळा परिसर मागील बाजूस घेऊन उद्यान तयार करणेत यावा जेणेकरुन येणा-या नागरिकांना बसण्याची सोय होईल तसेच नागरिकांचा गर्दीचा विचार करुन भविष्यामध्ये ट्रॅफिकचा त्रास होणार नाही. **४)** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा शेजारील आजूबाजूच्या परिसरातील अतिक्रमण त्वरीत काढणेत यावे. **५)** महानगरपालिकेच्या कार्यक्रमाची दैनंदीन डायरीमध्ये २६ व २७ नोव्हेंबर १९२७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सोलापूर येथे थोरला राजवाडा, मिलींद नगर, बुधवार पेठ येथील ब्रॉंझमधील बनविणेत आलेल्या शिल्पास अभिवादन करणे व २६ नोव्हेंबर संविधान दिन म्हणून संविधानाचे वाचन करण्याकरिता सोलापूर शहरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांना बोलावून सामुदायीक वाचन व अभिवादन करणेस तसेच सदरची नोंद महानगरपालिकेच्या कार्यक्रमाच्या दैनंदिन डायरीमध्ये करणेत यावा.

वरील अ.क्र. १ ते ३ ही कामे स्मार्ट सिटी निधी/ शासन अनुदान/अथवा महानगरपालिकेच्या भांडवली निधीतून करणेस, तसेच याकामाचे प्लॅन व एस्टीमेट तयार करुन येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/कामुली/क्रियात्व
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६६ ठ. क्र......232
दि.२४.१०.१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शासनाच्या अमृत व १४ व्या वित्त आयोगातून वृक्ष लागवडीसाठी प्राप्त झालेल्या अनुदानीत रकमेमधून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम सुरु आहे. या संदर्भात याच कार्यक्रमाचा भाग म्हणून मा. आयुक्त यांनी औषधी वनस्पतीचे वृक्ष लावणेसाठी महापालिकेच्या वतीने भोगांव येथे असलेल्या १२ एकर जागेवर आयुर्वेदीक उद्यान निर्मितीचा संकल्प जाहिर केला आहे. हा एक स्तुत्य उपक्रम असून कौतुकास्पद आहे. भारत सरकार औषधी वनस्पतींचे उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन देत असून औषधी वनस्पतीचे उद्यान ही महापालिका क्षेत्रात होणे हा संपूर्ण महाराष्ट्रात कौतुकाचा विषय होणार आहे. संकल्पीत कार्याची परिपुर्तता लवकरात लवकर करणेत यावी व या आुयर्वेदीक उद्यानास भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आयुर्वेदीक उद्यान असे नामरण केल्यास ती माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांना खरी श्रध्दांजली ठरेल. तरी महानगरपालिकेच्या संकल्पीत उद्यानाला **भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आयुर्वेदीक उद्यान** हे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६८ ठ. क्र. 233
दि. 12/10/95 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



हरीभाऊ तोरणे हे सोलापूर येथील फॉरेस्ट परिसरात धोत्रीकर चाळीमध्ये राहणारे रहिवाशी होते. प्रस्तावात नमूद कारणास्तव प्र.क्र. १५ अ अय्यर हॉस्पीटल ते जैन मेडीलकल जवळ असलेल्या धोत्रीकर चाळीजवळील रस्त्यास **हरिभाऊ तोरणे गुरुजी मार्ग** असे नामकरण करणेस, येणारे खर्चास व त्याप्रमाणे नामफलक लावणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६९ ठ. क्र.....२३८
दि.१२/१०/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील मेनडेपो बुधवार पेठ येथील एक एकर खुली जागा भाडेपट्टयाने आय.एम.सी.लि. सोलापूर यांना LNG Installation, CNG Retailing, Cascade Filing, DRS installation, office Space इ. च्या व्यवस्थेसाठी उपलब्ध करुन देणेबाबत प्रकरणी नमूद अ.क्र. १ ते १३ अटी व शर्तीनुसार आय.एम.सी.लि. सोलापूर यांना मेनडेपो बुधवार पेठ येथील असलेल्या खुल्या जागेपैकी एक एकर जागा २९ वर्षे ११ महिने कालावधीकरीता भाडेपट्टीने देणेबाबत मा. परिवहन समिती मार्फत प्रकरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३४५ (ड) अन्वये मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक २-८-१८ चे टिपणी प्रमाणे मा. म.न.पा. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेकामी मा. परिवहन समिती ठराव क्र. १६, दिनांक ४-८-२०१८ व मा. परिवहन समिती ठराव क्र. ३३, दिनांक २९-९-२०१८ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 960 ठ. क्र. 235
दि. 22/10/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१७०

सोलापूर महानगरपालिकेकडे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मक्तेदार श्री. सिध्दतेज कन्स्ट्रक्शन प्रो.प्रा. आनंद केशव मुदगल यांनी मक्तेदार नोंदणी करीता आवश्यक ती कागदपत्रे सादर केले असलेने व ती वर्ग **ब** करिता योग्य असल्यामुळे त्यांचे **ब** मध्ये नोंदणी करणेस व मान्यतेअंती मक्तेदार श्री. सिध्दतेज कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रु. १०,०००/- इतकी नोंदणी फी घेऊन, त्यांना वर्ग ब मध्ये नोंदणी करणेस, व नोंदणी प्रमाणपत्र देणेस, याकामी मक्तेदार नोंदणी करणेस्तव मा. स्थायी समितीची सभा होत नसलेने मक्तेदार यांचे नोदणी करणेच्या दृष्टीने प्रकरणी सक्षम मान्यता मिळणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३५ अ नुसार मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ३०-६-२०१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature) P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६७ ठ. क्र. २३६
दि. २१.०७.१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



विभागीय कार्यालय क्र.१ ते ८ कडील कुपनलिका दुरुस्ती करणे स्पेशल्स पुरविणे कामी सन २०१७-१८ चा वार्षिक मक्ता मंजूरी बाबत प्रकरण तिस-या वेळेस जाहिर प्रसिध्दीकरणास अनुसरुन एकुण दोन निविदा आलेले असून १) मक्तेदार राऊत कन्स्ट्रक्शन २) लक्ष्मीनारायण सेल्स कॉर्पोरेशन यांनी आपले दर भरुन दिलेले आहेत. प्रस्तावात नमूद कारणास्तव सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी प्रस्तावित केले नुसार तिस-या वेळेच्या ई-निविदा व जाहिर प्रसिध्दीकरणास अनुसरुन ३६ आयटेम करीता एल-१ निविदाधारक राऊत कन्स्ट्रक्शन व १५ आयटेमकरीता एल-१ निविदाधारक लक्ष्मीनारायण सेल्स कॉर्पोरेशन यांचेकडून त्यांनी वित्तीय निविदेत दिलेल्या सर्व अ.क्र.१ ते ५४ आयटेमच्या दराऐवजी वाटाघाटीअंती निश्चित व मान्य केलेल्या दराने विषयांकित पुरवठयाचे काम दोनही पुरवठाधारकाकडून काम करुन घेणेस, येणा-या खर्चास, करारपत्र करुन वर्कऑर्डर देणेस महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ७३(क) अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१०/०७/२०१८चे टिप्पणी प्रमाणे मान्यता देणेस्तव आलेले मा. आयुक्त यांचे दि.१०/०७/२०१८ टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर प्रकरणामधील मक्तेदार राऊत कन्स्ट्रक्शन या मक्तेदाराची काम करण्याची पध्दत ही महानगरपालिकेच्या व मक्त्याच्या शर्ती व अटीच्या हितास अनुरुप नसल्याने यापूर्वी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सबब सदरच्या मक्तेदाराविरुध्द त्याबाबतची कारवाई करण्यांत यावी व लक्ष्मीनारायण सेल्स कॉर्पोरेशन यांना सदरचे काम देणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.प्र.प.२.ठ. क्र......२३४
दि.११/१९.०१.१९.८..रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सोलापूर महानगरपालिकेच्या भांडवली कामातून प्रभाग क्र. १२ कारमपूरी कॉम्प्लेक्स ते ७८६ पिठाची गिरणी येथे ड्रेनेज लाईन घालणेकामी मा. मुख्यलेखापरिक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायावर मा. आयुक्त यांचे आदेशाप्रमाणे ठराव होणेस विनंती आहे. त्यास अनुसरुन प्रभाग क्र. १२ कारमपूरी कॉम्प्लेक्स ते ७८६ पिठाची गिरणी येथे ड्रेनेज लाईन घालणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. ०२/२०१७-१८ र.रु. ९,९७,४५२/- हे काम मक्तेदार गुरुराज कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेकामी वर्कऑर्डर देणेस, कामाची निकड पाहता प्रस्तावित केलेल्याप्रमाणे कार्यवाही आवश्यक आहे.मा. स्था.स. कार्यरत नसल्याने प्रस्ताव मा.स.सा.कडे एमएमसी ॲक्ट ३५ (अ) अन्वये मान्यतेसाठी मा. स.सा.कडे सादर करण्यात यावा. प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २२-७-२०१८ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासूली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६३.ठ. क्र.२३५
दि.१२/२०१९......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. २ शेळगी भिमनगर दलित वस्ती येथे २० सीट शौचालय बांधणे या कामाचे प्रस्तावात नमूद कारणास्तव तयार करण्यात आलेले पूर्वगणनपत्रक ४३ सन २०१७-१८ र.रु. २१,३६,७३६/- यास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या योजनेच्या बजेटमधून मंजूरी मिळालेली आहे. व तसेच मा. नगरअभियंता यांनी प्रस्तावित केल्यानुसार ई निविदा व जाहिर प्रसिध्दीकरणास अनुसरुन प्राप्त सर्वात कमी दराचे मक्तेदार महालिंगेश्वर कन्स्ट्रक्शन यांचेकडून निविदेत दिलेल्या मक्ता रकमेपेक्षा १४.१०% कमी दराने काम करुन घेण्यास व येणा-या खर्चास योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन वर्कऑर्डर देण्यात आली आहे. सदर कामाच्या ठिकाणी जुने शौचालय असून ते अत्यंत जीर्ण अवस्थेत असून सध्या त्याचा उपयोग नागरिकांना होत नसल्यामुळे सदरचे शौचालय बंद अवस्थेत आहे. त्यामुळे सदरच्या ठिकाणचे जीर्ण झालेले जुने शौचालय पाडण्यासाठी मा. आयुक्त यांच्या शिफारसीने प्रस्ता महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) ने व मा. स्थायी समिती सध्या कार्यरत नसलेने जुने जीर्ण झालेले शौचालय पाडून त्याच ठिकाणी नविन शौचालय बांधण्यासाठीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेकडे एमएमसी ॲक्ट कलम ३५(अ) अन्वये मंजूरीसाठी मा. आयुक्त यांचे दिनांक १५-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१०४ ठ. क्र. २३८
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१७४

प्रभाग क्र. १९ मध्ये नागेश भैरगुंडे घर ते आरती नगर येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन घालणेचे काम मक्तेदार मयुरा कन्स्ट्रक्शन यांचे नांवे मंजूर करणेस येणारे खर्चास तसेच मक्तेदारा समवेत करारपत्र करणेस मा. आयुक्त यांनी दि. १०-७-२०१८ रोजी मान्यता दिली असून सध्या मा. स्थायी समिती सभापतीची निवड प्रक्रिया न्यायप्रविष्ठ असलेने प्रकरणी जा.क्र.जल/७४६, दि. ६-८-२०१८ ने मक्तेदारास दिलेली वर्कऑर्डरची प्रत माहिती घेणेस्तव मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव पाठविणेस मा. आयुक्त यांनी दि. १५-८-१८ रोजी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने प्रभाग क्र. १९ मध्ये नागेश भैरगुंडे घर ते आरती नगर येथे पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन घालणे कामाचे अनुषंगाने मक्तेदार मयुरा कन्स्ट्रक्शन यांना जा.क्र. जल/७४६, दि. ६-८-२०१८ ने दिलेल्या वर्कऑर्डरची माहिती मा. सर्वसाधारण सभेकडून घेणेस मा. आयुक्त यांचे दि. १५-८-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रकरणामध्ये बजेटचा अभिप्राय दिसून येत नाही. सबब यापुढे येणा-या अशा सर्व प्रकरणामध्ये बजेटचा अभिप्राय देऊनच प्रकरणे मा. महानगरपालिकेच्या मान्यतेस्तव पाठविण्यात यावीत.

नगर सचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१६०४ ठ. क्र.......280
दि. २१.१०.१९९८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. १९ मधील आकाशवाणी केंद्र ते निलम नगर रोडवरील बनशंकरी हॉटेल लगत असलेल्या चौकास **जय बजरंग चौक** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदर चौकास यापूर्वीच बनशंकरी चौक असे नांव देणेत आले असून, तसा फलक त्याठिकाणी लावणेत आलेला आहे. त्यामुळे मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. जा.३०६..ठ. क्र.......289
दि. ...९२१.१०.१९.८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१७६

प्र.क्र. १९ मधील विनायक नगर परिसरात राहणारे श्री. तुळशीदास भंडारी यांचा मुलगा चि. बालाजी तुळशीदास भंडारी वय वर्षे २१ यांचे दि. ३० ऑगस्ट रोजी डेंग्यु सदृश्य आजाराने दुःखद निधन झाले. श्री. तुळशीदास यांना बालाजी हा एकुलता एक मुलगा होता. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून भंडारी कुटूंबावर कोसळलेल्या या संकटामुळे संपूर्ण कुटूंब कोलमडले आहे. तरी श्री. तुळशीदास भंडारी यांना महानगरपालिकेच्या वतीने जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेंत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज.९६५५.ठ. क्र. 282 दि. ९/२१.१०.१२.८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. २१ मधील मिरा हौसिंग सोसायटी व भाग्योदय हौसिंग सोसायटीच्या मधील रस्त्यास म्हणजेच पुढे शांती निकेतन शाळा व राणाप्रताप झोपडपट्टीच्या मधील मार्गास लोधी समाजाचे दैवत **श्री रुद्रमुनी मार्ग** असे नामकरण करणेस त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.९६६ ठ. क्र....243
दि.१२।१०।१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. मोहनिश श्रीनिवास गरदास वय-१९, राहणार - सोलापूर हा सध्या बी.कॉम - थर्ड ईयर मध्ये शिकत असून, त्यास गेल्या दोन वर्षापासून किडनीचा त्रास आहे. त्याला उपचारासाठी अश्विनी सहकारी रुग्णालय, सात रस्ता येथे डॉ. किरण जोशी यांच्याकडे उपचार घेत आहे. सध्या त्याचे किडनी खराब झालेले असल्याने प्रत्यारोपणाची वेळ आली आहे. त्यास त्याची आई सौ. राजलक्ष्मी श्रीनिवास गरदास यांनी किडनीचे दान करीत असून, त्याच्या प्रत्यारोपण व सर्जरीसाठी व इतर औषध खर्च मिळून एकूण र.रु. ७,००,०००/- (सात लाख रुपये) खर्च येण्याची शक्यता आहे. यासोबत हॉस्पिटलचे एस्टिमेट खर्च जोडला आहे. सदरचे ऑपरेशन दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी ठरलेली आहे. सध्या आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखिची असल्याने वडिल टेक्स्टाईल कारखान्यामध्ये काम करीत असून, आई घरकाम करीत आहे. सदरच्या उपचारासाठी व ऑपरेशनसाठी खर्च पेलण्यासारखी नसल्याने त्यांनी आर्थिक मदतीची मागणी केलेली आहे. श्री. मोहनिश श्रीनिवास गरदास याचे वय व त्याचे भविष्य पाहता त्यास आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता असून, त्यास मनपातर्फे जास्तीतजास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१८०.ठ. क्र....२४४
दि.१२/१०/१९८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२८०

सोलापूर शहरातील आंबेडकर चळवळीतील कालकथीत रामा तुकाराम सरवदे यांचा वारसा लाभलेले त्यांचे नातू, ज्येष्ठ नेते सोलापूर विद्यापीठाचे अधिसभा सदस्य, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे विश्वस्त, नालंदा शिक्षण संस्थेचे संस्थापक, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूलचे विश्वस्त, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमीचे विश्वस्त, शहर शांतता कमिटीचे सदस्य, सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे सदस्य व पक्षनेते, आरपीआय (ए) गटाचे प्रदेश सरचिटणीस गेल्या ४३ वर्षापासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमध्ये काम करणारे तसेच त्यांनी अनेक सामाजिक क्षेत्रामध्ये, शैक्षणिक क्षेत्रामध्ये, उद्योजकामध्ये उल्लेखनीय कार्य केलेबद्दल, आणि महाराष्ट्र शासनाचा दलितमित्र पुरस्कार व अनेक संस्थेचे पुरस्कार मिळालेले असून, तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या क्षेत्रात अनेक योजना कार्यान्वीत करण्यामागे त्यांचा सिंहाचा वाटा असलेले तसेच उच्च शिक्षीत असलेले मा. राजाभाऊ उर्फ सुधाकर तुकाराम सरवदे यांची महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाच्या (राज्यमंत्री पदाचा दर्जा) अध्यक्ष पदी निवड झालेबद्दल व त्यांनी सोलापूर शहरामध्ये केलेल्या अनेक उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने मानपत्र देऊन यथोचित सत्कार करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी यथोचित सत्कार करणेस मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

Sd/-
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

Scanned with CamScanner

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज१८१.ठ. क्र....२८५ दि.१२/१०/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जुना कुंभारी रोड लगत गेल्या अनेक वर्षापासून मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढलेली आहे. हद्दवाढ मधील या परिसरात बहुतांश प्रमाणात गोर-गरीब , कष्टकरी कामगारांच्या वसाहती आहेत. आकाशवाणी केंद्र परिसरातील अनेक छोटी-मोठी नगरे, गवळीवस्ती, निलम नगर, माळी नगर, बोळकोटे नगर, विनायक नगर, सुनील नगर, आशा नगर, कलावती नगर आदी भागात मिळून साधारण ४० ते ५० हजार लोकवस्ती असून या सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविणे अत्यावश्यक आहे. महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी सुध्दा नागरिकांना साधारण तीन किलोमीटर पेक्षा जास्त अंतर दूर जावे लागते. या बाबींचा विचार करुन या भागात महानगरपालिकेच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतीगृह निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहती (एमआयडीसी) मधील ओपन स्पेस क्रमांक १० हे आकाशवाणी केंद्र ते निलम नगर रोडच्या लगत डाव्या बाजूस असून याचे क्षेत्र ४८ हजार चौ.मी.आहे. सध्या या जागेवर महानगरपालिकेच्यावतीने झाडी लावून हरित क्षेत्र विकसित करण्याचे नियोजन असून या जागेपैकी केवळ १० ते १५ टक्के जागा सार्वजनिक दवाखान्यासाठी वापरण्यात आली तर मोठ्या प्रमाणात नागरिकांचे हित जोपासले जाणार आहे. म्हणून एमआयडीसीच्या ओपन स्पेस क्र.१० मध्ये महानगरपालिकेचे प्राथमिक आरोग्य केंद्र य प्रसुतीगृह करण्यासाठी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन त्या प्रमाणे बांधकाम करण्यास येणाऱ्या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासूली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१८२ ठ. क्र. २८६
दि. १२/१०/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मुस्लिम बांधवांचा पवित्र सण बकरी ईद. ज्याला इदूल-अझहा असेही म्हणतात. तसेच बकरी ईद सणाच्या जवळपास आषाढ (आकाड ) महिना येतो. त्या दरम्यान हिंदू बांधवांच्यावतीने कोंबड्या व बकरी यांची मागणी मोठ्या प्रमाणात असते. हे दोन्ही सण ऐन पावसाळ्यात येतात. या पावसामुळे बकरी ईदच्या दिवशी ज्या बकऱ्यांची कुर्बानी दिली जाते. त्या बकऱ्या पावसात भिजतात, बऱ्याच वेळेला त्या बकऱ्यांना त्यामुळे तापही येतो. ती बकरी आजारी पडून नरम पडतात. कोंबड्यांचीही तशीच अवस्था होते. तसेच मुस्मिम बांधवांना बकरी ईदसाठी जी बकरी लागतात. त्या त्याची खरेदी करणेसाठी भरपावसात सहकुंटूब सहपरिवार पावसात भिजतच खरेदी करावे लागते. यात मुस्लिम परिवारास अनेक संकटांना सामोरे जावे लागते. तसेच ग्रामीण भागातून जे शेतकरी व व्यापारी बकरी विकण्यासाठी येतात. त्यांची ही गैरसोय होत आहे. ते शेतकरी रस्त्यावर, फुटपाथवर बकरी बांधून व कोंबड्याच खुराडे ठेऊन विक्री करतात. त्यांची खास अशी बाजारपेठ नाही. त्यामुळे विक्रेत्यांची व खरेदीदारांची जशी गैरसोय होते. त्याच प्रमाणे त्या मार्गावरील रहदारीस अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तेंव्हा महाराष्ट्रातील इतर प्रगत महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिकेच्या मालकीच्या रिकाम्या जागेत मंडप टाकून बकरी ईदच्या दहादिवस अगोदर बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाते.

तशाच प्रकारची बाजारपेठ सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील म.न.पा.च्या मालकीच्या रिकाम्या जागेत / मैदानात पत्र्याचे शेड मारुन विनामुल्य, महानगरपालिकेच्या खर्चाने सोय होणेसाठी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याबाबत संपूर्ण माहिती घेऊन कार्यवाही करणेबाबत मा. आयुक्त यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१८३ ठ. क्र....२४७
दि.२५.१०.१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बुध्द प्रेरणा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, न्यू सुनिल नगर, अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. सोलापूर हया संस्थेच्या वतीने एम.आय.डी.सी. मधील यंत्रमाग कामगार ऑफिस लगत पोलीस ठाणे पुढील चौकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने चौकाचे सुशोभिकरण करण्यांत आले असून, त्याठिकाणी वृक्षारोपण करुन झाडांची संगोपन सदरहू संस्थेच्या वतीने करण्यांत येत आहे. सबब सदरहू चौकास **सिध्दार्थ चौक** असे नामकरण करणेस, तसेच तेथून जाणारा प्रमुख रस्ता कोंडा नगर ते सोलापूर आकाशवाणी रोड या रस्त्यास **समता पथ** असे नामकरण करणेस, फलक लावणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तात-१/१८४ ठ. क्र. २४८
दि. २४.१०.१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-१/१८४

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मा. मोहन भागवत यांनी स्वातंत्र्य संग्रामामध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे योगदान त्यांनी मान्य केले आहे व काँग्रेस पक्षाने या देशाला मोठे नेते दिले आहेत असे वक्तव्य केले आहे. त्यामुळे ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

…लापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. तात-३/१८६ ठ. क्र. २४९
दि. १२/१०/१९८ ... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

तात-३/१८६

प्रभाग क्रमांक १६-क मधील रहिवाशी श्रीमती हमीदाबी रियाज शेख हया महिलेस स्वाईनफ्ल्यू आजार झाल्याने त्यांना हॉस्पीटलमध्ये दाखल केले असता त्याठिकाणी औषधोपचार चालू असताना मृत्यू झाला. तसेच याच भागातील कृष्णा भागानगरे यांना डेंगू झाल्याने त्यांचा देखील औषधोपचार घेत असताना मृत्यू झाला. वरील दोनही व्यक्तींची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, श्रीमती हमीदाबी शेख यांना तीन मुली आहेत व कृष्णा भागानगरे यांच्या पश्चात त्यांचे आई-वडील असून, त्यांची देखील आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखिची आहे. सबब वरील दोनही कुटूंबियांना आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता असून, सोलापूर महानगरपालिकेकडून सदर कुटूंबास जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
…लापूर महानगरपालिका